cmyk

## संपादकीय

### मणिपूर शांत झालेय?

ईशान्य भारत हा देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत नाजूक भाग आहे. 'चिकन नेक' या नावाने ओळखली जात असलेली जमिनीची चिंचोळी पट्टी ईशान्य भारताला देशाच्या मुख्य भागाशी जोडण्याचे काम करते. त्याच भागावर वार करून ईशान्य भारताला देशापासून तोडण्याचे प्रयत्न आपला सख्खा शेजारी अन् पक्का वैरी असणारा चीन अनेक दिवसांपासून करतो आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-८७ | रविवार दि.७ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### नीट परिक्षेतील आरोपी जलील पठाणला चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी

लातूरः नीट परीक्षेमध्ये लातूरच्या दहा विद्यार्थ्यांचे गुण वाढवून दिल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणातील आरोपीला शनिवारी कोर्टाने १४ दिवसांची न्यायालयन कोठडी सुनावली आहे. बिहारच्या पाटण्यात उघड झालेल्या नीट परीक्षेच्या घोटाळ्याचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडत आहेत. लातूरला विद्येची नगरी म्हटले जाते. तिथे सीबीआयची टीम तपास करत आहे. तब्बल १० विद्यार्थ्यांचे गुण वाढवून दिल्याचे प्रकरण पुढे आलेले आहे. नीट पेपर फुटी प्रकरणातील आरोपी जलील पठाण याला शनिवारी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.


# अगोदरच मोठी किमत मोजावी लागली, कांदा निर्यात बंदी नकोच!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**विरोधक घाबरलेले आहेत, त्यांनी काहीही आरोप केले तरी आपण विकासावरच बोलायचे. कांद्या निर्यात बंदीच मोठी किंमत मोजावी लागली, काहीही करा, पण निर्यात बंदी करु नका, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याकडे केली आहे. कांदा निर्यात बंदी आणि कमी भाव याचा भाजप व महायुतीला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसला आहे.**





**त्यापार्श्वभुमीवर ही मागणी महत्वाची मानली जात आहे.**

केंद्र सरकारने गेल्या काही वर्षात कांदा निर्यात बंदी केल्याने कांद्याचे भाव पडले. परिणामी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला. कांदा पिकासाठी झालेला खर्चही न निघाल्याने शेतकऱ्यांच्या मनात केंद्र सरकारवर संताप होता. लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्वच उमेदवारांना याचा फटका बसला. नाशिक विभागात तर महायुतीचे उमेदवार कांद्याच्या प्रश्नामुळे पराभूत झाले. त्यामुळे अजित पवार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर कांदा उत्पादक शेतकऱ्यांची बाजू मांडताना दिसले. शासकीय योजना व त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात राज्यस्तरीय महायुती पदाधिकारी बैठक षन्मुखानंद सभागृह, मुंबई येथे पार पडली. काहीही करा पण कांद्याची निर्यात बंदी करु नका, अगोदरच कांदा निर्यात बंदीची मोठी किमत मोजावी लागली आहे. त्यामुळे यापुढे निर्यात बंदी करु नका अशी मागणी केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्याकडे अजित पवार यांनी केली आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुका झाल्या. महाराष्ट्रात आपल्याला अंदाज व्यक्त करत होतो, तसे यश मिळाले नाही. इतर राज्यात यश मिळाले, त्यामुळे देशात एनडीएचे सरकार आले. त्याबद्दल मी नरेंद्र मोदींचे अभिनंदन करतो, असेही ते म्हणाले.

### *कांदा उत्पादकांची नाराजी परवडणार नाही*

***कांदा निर्यात बंदी केल्याने महाराष्ट्रात कांद्याचे भाव पडले. त्याचा फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीत बसला. काही उमेदवार केवळ कांदा उत्पादकांच्या नाराजीमुळे पराभूत झाले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांची नाराजी महायुतीला परवडणारी नसल्याची बाब अजित पवार यांच्या लक्षात आली आहे. त्यामुळे त्यांनी या मुद्दयावर जास्त लक्ष दिले आहे.***

# ...तर २८८ पैकी तुमचा एकही उमेदवार निवडून येणार नाही

## मनोज जरांगे यांनी पुन्हा छगन भुजबळ यांना डिवचले

**हिंगोली । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणाची मागणी करणारे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शांतता रॅलीला सुरुवात केली आहे. जरांगे पाटील आज हिंगोलीमध्ये असून या ठिकाणी समाजबांधावांना उद्देशून त्यांनी जाहीर भाषण केले. मनोज जरांगे-पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये छगन भुजबळांचे ऐकून मराठ्यांवर अन्याय केला तर २८८ मतदारसंघांमधून सत्ताधाऱ्यांचा एकही उमेदवार निवडून येणार नाही, असा थेट इशाराच दिला आहे.**

यावेळी मनोज जरांगे म्हणाले, तुम्हाला बघून आज माझं मन भरून आलं आहे. सकाळपासून आपण भूक हरवून उपस्थित राहिलात यासाठी मी आपले ◂◂ पान २ वर




### *१३ तारखेपर्यंत आरक्षण मिळाले नाही तर..*

*कैकाडी समाजाच शिष्टमंडळ मला भेटले. आमची एकच जात आहे. विदर्भात ते एससी आरक्षणात आहेत. विदर्भातील कैकाडी मराठवाड्यात आले की जात बदलते. आरक्षण मिळत नसल्याने मराठ्यांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळत नाही. नोकरी लागत नाही. १३ तारखेच्या आत मराठ्यांना आरक्षण द्या. तसं झालं नाही तर झालेला निर्णय तुम्हाला झेपायचा नाही," असं जरांगे सरकारला इशारा देताना म्हणालेत. नक्की वाचा बारामतीत विधानसभेला काका विरुद्ध पुतण्या? सुप्रियांचं सूचक विधान; म्हणाल्या, कोणतीही...*

### *राजकारणाची इच्छा नाही*

*मराठा समाजाला आरक्षण मिळावे एवढीच आमची अपेक्षा आहे. राजकरण करायची आमची इच्छा नाही. जर आम्हाला राजकारणाकडे ओढलं तर तुमचं तुम्ही बघा, असा इशारा जरांगेंनी दिला. तसेच पुढे बोलताना, सरसकट मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या. १९६७ ला १८० जाती आरक्षणाखाली घातल्या. त्यात ८३ क्रमांकाला कुणबी आहे. व्यवसायाला आरक्षण दिलं गेलं. माळी समाजाची जात १९६७ आरक्षणाअंतर्गत घातली. एका माळी समाजातील सर्व पोटजाती आरक्षणात घातल्या. ८३ क्रमांकाला कुणबी आहेत. विदर्भातील मराठा समाज त्यात आहे. आमचा रोटी-बेटी व्यवहार हकतो. त्यांना जर व्यवसायावर आरक्षण दिलं तर आमचा व्यवसाय ही शेतीच आहे. १८० जातीच्या पोट जाती म्हणून ३५० जाती यांनी आरक्षणात घतल्यात," असे जरांगे म्हणाले.*

### *मराठा आमदारांना आवाहन करताना जरांगे भावुक*

*मराठा आरक्षणासाठी लढणारे आंदोलक मनोज जरांगे-पाटील हे मराठा आमदारांना साद घालताना भावनिक झाल्याचे चित्र हिंगोलीमध्ये पाहायला मिळाले. हिंगोलीमधून जरांगेंनी आजपासूनच मराठा आरक्षणासाठी शांतता रॅलीला सुरुवात केली. या रॅलीमधील पहिल्याच भाषणात मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा आमदारांना मराठा आरक्षणासाठी समाजाच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले. यावेळी बोलताना जरांगे-पाटील भावूक झाले. त्यांना आपले अश्रु रोखता आले नाहीत.*

## मोदी सरकार २३ जुलै रोजी सादर करणार अर्थसंकल्प

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशात १८ व्या लोकसभेच्या स्थापनेनंतर मोदी सरकार तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ च्या तारखा आज जाहीर झाल्या आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन २३ जुलै रोजी संसदेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. १८व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन संपले आहे. ज्यामध्ये नवनिर्वाचित खासदारांना शपथ दिली गेली. लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीला



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संबोधित केले. आता अर्थसंकल्पीय अधिवेशन होणार आहे. संसदेचे हे अधिवेशन २२ जुलै ते १२ ऑगस्टपर्यंत चालणार आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये मोदी ३.० सरकार करदात्यांसाठी ◂◂ पान २ वर

### *निर्मला सितारामन यांचा रेकॉर्ड*

*निवडणुकीचं वर्ष असल्याने या वर्षी दोनदा अर्थसंकल्प सादर केला जात आहे. १ फेब्रुवारी २०२४ रोजी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आला. आता नवे सरकार स्थापन झाल्यानंतर संपूर्ण केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या नावावर एक अनोखा विक्रम नोंदवला जाणार आहे. सलग सात केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणाऱ्या त्या पहिल्या अर्थमंत्री ठरणार आहेत. ते मोरारजी देसाई यांना मागे टाकतील. देसाई यांनी सलग सहा अर्थसंकल्प सादर केले होते.*

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, चिन्ह प्रकरणावरील सुनावणी १६ जुलैला?



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह अजित पवारांना देण्यात आले. या निर्णयाला शरद पवार गटाकडून आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या याचिकेवर आता १६ जुलैला सुनावणी होण्याची शक्यता आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर सर्वोच्च न्यायालयाचे नियमित कामकाज ८ जुलैपासून होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर शरद पवार गट आणि अजित ◂◂ पान २ वर

## पक्ष कोणाचा? चिन्ह कोणाचे? निवडणुकीआधीच होणार फैसला

### *असिम सरोदे यांचा खळबळजनक दावा; सर्वांच्याच भुवया उंचावल्या*

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूक आता काही महिन्यांवर आली आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा फटका बसला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फुटल्यामुळे राज्यात मोठी खळबळ माजली होती. आता पक्ष आणि चिन्ह कोणाचे याचा फैसला विधानसभा निवडणुकीआधी होणार असल्याचा खळबळजनक दावा असिम सरोदे यांनी केला आहे.**

शिवसेना आणि राष्ट्रवादी फुटल्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना मोठा धक्का



बसला होता. आधी एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्ष आणि चिन्ह गेले त्यानंतर अजित पवार यांना देखील पक्षाचे नाव आणि चिन्ह मिळाले. त्यामुळे दोन्ही गटाने वेगवेगळ्या निवडणुका लढवल्या होत्या. पण यामध्ये अधिक फायदा उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या गटालाचा झालेला पाहायला मिळाला. पण विधानसभा निवडणुकीत चित्र काय असेल हे येणारी वेळच सांगेल. त्याआधी असीम सरोदे यांनी महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. ◂◂ पान २ वर

## बीड सायबर पोलीसांची कौतुकास्पद कारवाई!

**» मध्यप्रदेशात जाऊन टोळीचा पर्दाफाश, पाचजण अटकेत**

**» बीड मधील डॉक्टरला लावला होता ५७ लाखाला चुना**

**बीड । प्रतिनिधी**

ऑनलाईन फॉरेक्स मार्केटमध्ये गुंतवणुक करून नफा कमविण्याचे आमिष दाखवून बीड मधील डॉक्टरला ५७ लाख २० हजाराची फसवणूक करण्यात आली होती. बीडच्या सायबर पोलिसांनी याचा तपास लावताना थेट मध्य प्रदेश गाठले आणि तिथून सायबर टोळीचा पर्दाफाश करीत पाच ◂◂ पान २ वर





### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.६ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : २२.५० क्विंटल | २,३०१ | ३,१०० | २,६९३ |
| ज्वारी/हायब्रिड :२०.५० क्विंटल | २,३८० | २,७१८ | २,५२९ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : २.५० क्विंटल | ९,४०० | १०,४०१ | ९,९०० |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,४०० | २,७०० | २,५७८ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ४,००१ | ४,५०० | ४,३२५ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |

# महाराष्ट्र ठरले सर्वोत्कृष्ट कृषी राज्य

## १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा पुरस्कार जाहीर, १० जुलै रोजी मुख्यमंत्री स्विकारणार पुरस्कार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**१५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. भारताचे माजी मुख्य न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखालील १५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने ही घोषणा केली आहे. नवी दिल्ली येथे १० जुलै रोजी होणाऱ्या सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.**



या पुरस्कारांसाठी समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात बांबू लागवड, तृण धान्य-श्रीअन्न अभियान आणि औष्णिक वीज निर्मितीत बायोमासचा वापर अशी क्रांतिकारी पावले उचलली आहेत. या पावलांमुळेच हा प्रतिष्ठेच्या मानांकित पुरस्कारावर महाराष्ट्राचे नाव कोरले गेल्याचे पाशा पटेल यांनी नमूद केले आहे. यापुर्वी हा पुरस्कार २०२३ मध्ये तामिळनाडुला, २०२२ मध्ये उत्तर प्रदेशला मिळाला होता. समितीचे विद्यमान अध्यक्ष न्या. सदाशिवम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा या पुरस्कार निवड समितीमध्ये समावेश आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने अनेक ◂◂ पान २ वर

### » *कृषी नेतृत्व संमेलनात होणार सन्मान*

*हा पुरस्कार १० जुलै रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या १५ व्या कृषी नेतृत्व संमेलनात प्रदान केला जाईल. या संमेलनात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान तसेच ब्राझील, अल्जेरिया, नेदरलँडचे राजदूत, महाराष्ट्र, यूपी, हरियाणा, हिमाचल प्रदेश, नागालँड या राज्याचे मंत्रीगण व इतर मान्यवर सहभागी होणार आहेत.*

### » *यापुर्वी यांना मिळाला पुरस्कार...*

*आतापर्यंत हा पुरस्कार केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, शिवराजसिंह चौहान, ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार अखिलेश यादव तसेच स्व. प्रकाशसिंह बादल, स्व. वर्गीस कुरियन, स्व. एमएस. स्वामिनाथन यांना दिला गेला आहे. अँग्रीकल्चर टुडेच्यावतीने या पुरस्कारांची सुरवात केली आहे. स्व. स्वामीनाथन यांनी दहा वर्षे या संस्थेचे अध्यक्षपद भुषवलेले आहे. सध्या डॉ.एम. जे. खान या संस्थेचे अध्यक्ष आहेत.*

cmyk

## अग्रलेख

# मणिपूर शांत झालेय?

ईशान्य भारत हा देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत नाजूक भाग आहे. 'चिकन नेक' या नावाने ओळखली जात असलेली जमिनीची चिंचोळी पट्टी ईशान्य भारताला देशाच्या मुख्य भागाशी जोडण्याचे काम करते. त्याच भागावर वार करून ईशान्य भारताला देशापासून तोडण्याचे प्रयत्न आपला सख्खा शेजारी अन् पक्का वैरी असणारा चीन अनेक दिवसांपासून करतो आहे. चीनचे हे प्रयत्न हाणून पाडायचे असल्यास व देशाची अखंडता कायम ठेवायची असल्यास ईशान्य भारतात शांतता कायम ठेवणे, तेथील विकासाला गती देऊन जनतेच्या आशा-आकांक्षांच्या पूर्ततेसाठी प्रामाणिकपणे झटणे आणि तेथील जनतेच्या मनात अन्यायाची वा वेगळेपणाची भावना निर्माण होणार नाही याची काळजी घेणे ही सर्वच राज्यकर्त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे.

मुळात ईशान्य भारताची शांतता व स्थैर्य हा राजकारणाचा विषय नाहीच! दुर्दैवाने याचे भान सध्या राजकीय पक्षांना राहिले आहे का? असाच प्रश्न उपस्थित व्हावा, अशीच परिस्थिती पहायला मिळतेय. मागच्या चौदा महिन्यांपासून मणिपूर हिंसाचाराच्या व संघर्षाच्या वणव्यात होरपळत असताना देशाचे कर्तेधर्ते असणारे सत्ताधारी व विरोधक याबाबत कितपत गंभीर आहेत? असाच प्रश्न निर्माण होतो. देशाच्या सर्वोच्च सभागृहांत या मुद्यावर जेव्हा चर्चा होते तेव्हा मणिपूरमधील संघर्ष व हिंसाचार याबाबत सत्ताधारी व विरोधकांना खरोखर काही चिंता आहे, असे अजिबात जाणवत नाही. विरोधक याकडे सत्ताधाऱ्यांची राजकीय कोंडी करण्याचा हुकमी मुद्दा म्हणून बघतात तर सत्ताधारी इतिहासातील घटनांचे दाखले देऊन विरोधकांचे हल्ले परतविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनातही हेच चित्र पहायला मिळाले. मणिपूरमधील हिंसाचारास तब्बल १४ महिन्यांचा काळ लोटल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले मौन सोडले व मणिपूरमधील हिंसाचार कमी होत असल्याचा दावा केला. राज्यात संपूर्ण शांतता प्रस्थापित करण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जात असल्याचा दावा त्यांनी केला. पंतप्रधान मणिपूरबाबत सविस्तर निवेदन करतायत असे चित्र निर्माण करण्याचा मोदींचा पूर्ण प्रयत्न होता. मात्र, पंतप्रधान म्हणून मोदी स्वत: या मुद्यावर आजवर का बोलले नाहीत. त्यांनी स्वत: मणिपूरला भेट देऊन हिंसाचार थांबविण्यासाठी ठोस प्रयत्न का केले नाहीत? या विरोधकांच्या मुख्य प्रश्नांना वा आक्षेपांना त्यांनी सपशेल बगल दिली. उलट काँग्रेसच्या काळात मणिपूरमध्ये दहा वेळा राष्ट्रपती राजवट लागू करावी लागल्याची आठवण करून देत त्यांनी या मुद्यावरून विरोधकांवर प्रतिहल्ला चढविण्यात धन्यता मानली. या मुद्यावरून राजकारण न करण्याचे आवाहन विरोधकांना करताना काही तत्त्वे या आगीत तेल ओतण्याचे काम करत असल्याचा आरोप करून मोदींनी स्वत:च विरोधकांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय गृहमंत्री व गृह राज्यमंत्री मणिपूरमध्ये काही दिवस तळ ठोकून बसल्याचा उल्लेख त्यांनी आवर्जून केला पण सरकारचा प्रमुख म्हणून स्वत: याबाबत पुढाकार का घेतला नाही व आताही तो का घेतला जात नाही, या मुद्याला मात्र त्यांनी बगलच दिली. साहजिकच पंतप्रधानांच्या या उत्तरावर विरोधकांचे समाधान झाले नाहीच व त्यांनी सभात्याग केला. आणि या मुद्यावरून राजकारण नको असे म्हणत राजकारणाला सुरुवात झाली. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधानांवर केलेल्या कडवट टीकेतून त्याचे स्पष्ट संकेत मिळालेले आहेतच! प्रत्यक्षात मणिपूरला १४ महिन्यांनंतरही शांततेची प्रतीक्षाच आहे. उलट या राज्यात आता कुकी आणि मैतेई यांचा ज्या भागात प्रभाव आहे त्यानुसार राज्याची दोन भागांमध्ये विभागणीच झाल्याचे चित्र आहे. राज्यातील इम्फाळ खोरे मैतेईंच्या ताब्यात तर राज्याचा डोंगराळ भाग व सीमावर्ती भागावर कुकी-जोस जमातीचा ताबा आहे. मणिपूरच्या सोळा जिल्ह्यांपैकी इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, बिष्णूपूर, कक्चिंग आणि थोबल हे पाच जिल्हे इम्फाळ खोऱ्यात मोडतात. तेथे स्थिती सामान्य दिसत असली तरी पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील शेवटच्या काही गावांपासून राज्यातील तणावाचे पडसाद पहायला मिळतात. रस्त्याच्या कडेला असणा-या छावण्यांमधून गस्ती पथके गस्त घालताना दिसतात. राज्याच्या डोंगराळ भागातून विस्थापित झालेले हजारो लोक अजूनही मदत शिबिरांच्या आश्रयाला आहेत. कुकीबहुल डोंगराळ भागात प्रशासकीय कामकाज पूर्णपणे ठप्प आहे. हिंसाचारामुळे मैतेई समाजातील सर्व सरकारी कर्मचारी राजधानी इम्फाळ व मैतेईंचे वर्चस्व असलेल्या भागात निघून गेले आहेत. तर कुकी जमातीचे कर्मचारी कुकींचे वर्चस्व असणा-या भागात निघून आले आहेत. हिंसाचारानंतर कुकीबहुल डोंगराळ जिल्ह्यांमध्ये 'स्व-शासना'चा मुद्दा उपस्थित केला जातो आहे. जर मणिपूरमधील हिंसाचार व संघर्षाने राज्याची अशी थेट दोन भागांमध्ये विभागणीच करून टाकली असेल तर मणिपूर शांत झालेय वा परिस्थिती सामान्य झालीय, असे म्हणण्याचे धाडस करता येईल का? मात्र, पंतप्रधानांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात बिनदिक्कत हे धाडस करून दाखविले. मग सरकार या मुद्यावर गंभीर आहे, याची मणिपूरच्या जनतेला खात्री कशी पटावी? याचाच परिणाम म्हणून ताज्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआला ईशान्य भारतातील मतदारांनी साफ नाकारले आहे. मणिपूरमधील दोन्ही जागा रालोआला गमवाव्या लागल्या. मेघालयातील दोन्ही आणि नागालँड, मिझोराममधील प्रत्येकी एक जागा विरोधकांनी जिंकली. मात्र, पंतप्रधान उलट मणिपूरची जनता विरोधकांना नाकारेल असा दावा सभागृहात करतात! खरं तर मणिपूरमधला हिंसाचार वा संघर्ष सरकारी पातळीवर होत असलेल्या वांशिक भेदभावाचा पुरस्कार झाल्यानेच चिघळला आहे. त्यावर मात्र पंतप्रधान कुठलेच ठोस पाऊल उचलत नाहीत की, भाष्यही करत नाहीत. मग मणिपूरची जनता या सरकारच्या शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांवर वा तशा दाव्यांवर विश्वास कशी ठेवणार हा प्रश्नच! राजकारणात विरोधकांवर पलटवार करण्यासाठी केले जाणारे दावे किंवा दिले जाणारे दाखले समजू शकतात. मात्र, केवळ विरोधकांना गप्प केल्याने परिस्थिती थोडीच बदलणार आहे? ती बदलायची तर राजकारणाच्या पुढे जाऊन मूळ समस्येवर उपाय शोधावा लागतो. असा उपाय शोधण्याची जबाबदारी अर्थातच सरकारमध्ये बसलेल्यांचीच सर्वाधिक आहे. पंतप्रधानांना या जबाबदारीचा विसर पडल्याचेच त्यांच्या निवेदनातून स्पष्ट होते.

## लाडकी बहीण योजना कार्यान्वित केल्याबद्दल ना.धनंजय मुंडे यांचा महिलांकडून सत्कार



**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्यात नव्याने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वित केल्याबद्दल परळी वैद्यनाथ येथील जगमित्र कार्यालयामध्ये राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकारी तसेच परळीतील अनेक महिला भगिनींनी एकत्र येऊन सत्कार करत त्यांच्या माध्यमातून महायुती सरकारचे आभार मानले आहेत.**

राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून याद्वारे आर्थिक दुर्बल कुटुंबातील महिला भगिनींना थेट दीड हजार रुपयांचे मासिक अर्थसहाय्य मिळणार आहे. या योजनेच्या माध्यमातून परळी वैजनाथ मतदारसंघासह बीड जिल्ह्यात जास्तीत जास्त महिला भगिनींना लाभ मिळवून देण्यासाठी सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन यावेळी धनंजय मुंडे यांनी सर्व उपस्थित महिला पदाधिकाऱ्यांना केले आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी आपल्या जगमित्र या संपर्क कार्यालयात आज परळी ते बीड जिल्ह्यातील जनतेशी जनता संवाद उपक्रमाच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी नेहमीप्रमाणे असंख्य कार्यकर्ते व नागरिक आपले वेगवेगळे प्रश्न अडचणी व समस्या घेऊन धनंजय मुंडे यांना भेटले; तर शक्य त्या ठिकाणी लगेचच फोन करून किंवा संबंधितांना पत्र देऊन किंवा अन्य मार्गांनी संबंधितांची कामे मार्ग लावण्याचे काम धनंजय मुंडे यांनी केले. हजारावर नागरिक व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आज दुपारी तीन वाजता सुरू झालेला जनता दरबार सायंकाळी नऊ वाजले तरीही सुरू होता!

## राजस्थानी आदर्श बालक मंदिराला स्टडी टेबलची अमूल्य भेट

### अमोल चिपाडे व चिपाडे परिवाराकडून मुलीच्या वाढदिवसानिमित्त अनोखी भेट

**बीड । प्रतिनिधी**

**येथील राजस्थानी सेवा समाज अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या राजस्थानी आदर्श बालक मंदिराला अमोल चिपाडे व परिवाराच्या वतीने चोवीस स्टडी टेबलची अनोखी भेट देण्यात आली.**

कु. वैष्णवी अमोल चिपाडे या विद्यार्थिनीने द्वारकादास मंत्री राजस्थानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड येथून नुकतीच दहावीची परीक्षा ९३.५ टक्के घेऊन घवघवीत यश तिने संपादन केले. संपूर्ण परिवाराला याचा आनंद तर झालाच पण ज्या शाळेत तिला एवढे चांगले शिक्षण व संस्कार मिळाले त्या शाळेला छोटीशी भेट म्हणून कु. वैष्णवीच्या वाढदिवसानिमित्त द्यावी असे अमोल चिपाडे आणि चिपाडे परिवाराला वाटले. अमोल चिपाडे व त्यांचे मित्र महेंद्रजी सारडा हे एक दिवस शाळेला भेट देऊन कोणते साहित्य आवश्यक आहे ते जाणून ही भेट देण्याचे ठरवले. आज एका छानशा कौटुंबिक सोहळ्यात तिच्या



हस्ते या भेटीला शाळेकडे सुपूर्द करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री विष्णूदासजी तापडिया साहेब, संस्थेचे सचिव श्री रामेश्वरजी कासट साहेब, श्री अशोक चिपाडे, सौ. प्रमिला चिपाडे, अमोल चिपाडे, सौ.शिल्पा चिपाडे, श्री महेंद्रजी सारडा, कु. स्नेहल, कु. अनुष्का व चि.राजवर्धन उपस्थित होते. शाळेच्या वतीने चिपाडे परिवाराचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री गिरीशजी सोहनी यांनी केले त्यांनी कु. वैष्णवीचे कौतुक करताना विद्यार्थ्यांनी नक्कीच समाजाच्या व परिवाराच्या ऋणातून उतराई व्हावे असे यावेळी बोलताना म्हणाले. कु. वैष्णवी हीने मनोगत व्यक्त करताना म्हनाली शाळेने खूप छान शिक्षण तर दिलेच पण त्या बरोबर संस्कार ही दिले, या पुढे पण शाळेसाठी नक्की काहीतरी करण्याची माझी इच्छा राहील असे वैष्णवी सांगितले. श्री. अमोल चिपाडे यांनी सुद्धा आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. संस्थेचे सचिव श्री रामेश्वरजी कासट साहेब यांनी यावेळी अमोल चिपाडे आणि चिपाडे परिवाराचे विशेष कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात श्री विष्णूदासजी तापडिया यांनी वैष्णवी जरी दहावी पास झाली तरी तिची जडणघडण बालवाडी पासूनच झाली म्हणून परिवाराने बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी चांगली भेट दिली असे यावेळी नमूद केले. यावेळी व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे प्राचार्य श्री कसबे सर, उप मुख्याध्यापक श्री लाहोटी सर, श्री दोडे ,श्री बोरा , बियाणी,भुतडा, करवा, तोतला, औटी, इ. शिक्षकवृंद यावेळी उपस्थित होते. बालवाडीच्या छोट्या विद्यार्थ्यांनी कु. वैष्णवीला बुके देऊन तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नंदकिशोर लड्डा यांनी केले तर श्री बोरा सरांनी आभार व्यक्त केले.

## गढी महाविद्यालयात वित्तीय साक्षरता कार्यशाळा संपन्न

**गढी । प्रतिनिधी**

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे वाणिज्य विभाग, ग्रंथालय विभाग व खट-उ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वित्तीय साक्षरता या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील चार्टर्ड अकाउंटंट श्री. अनुप मुंदडा तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे उपस्थित होते. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना चार्टर अकाउंटंट श्री. अनुप मुंदडा यांनी असे प्रतिपादन केले की, भविष्यकालीन



तरतुदीसाठी व सुरक्षित जीवनासाठी गुंतवणूक महत्त्वाची आहे. सुरक्षित गुंतवणूक केल्यामुळे शिक्षण,आरोग्य यासारख्या मूलभूत गरजा योग्य प्रकारे पूर्ण करता येतात. यावेळी त्यांनी अल्पकाळासाठी व दीर्घकाळासाठी गुंतवणूकचे विविध प्रकार, त्याचे फायदे तोटे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.डॉ. सदाशिव सरकटे यांनी असे प्रतिपादन केले की सध्या शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करताना बऱ्याच वेळा फसवणूक होते. त्यामुळे योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे आवश्यक असते. गुंतवणूक करताना आपण वित्तीय साक्षर असो तर आपण स्वतःचा बचाव करू शकतो. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. महारुद्र गव्हाणे यांनी असे प्रतिपादन केले की ज्याप्रमाणे विविध प्रकारच्या संशोधनासाठी आपण माहितीच्या स्त्रोतांचा उपयोग करतो त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या वित्तीय साक्षरता कार्यशाळेच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीचा उपयोग आपण आपल्या जीवनामध्ये करून आपले जीवन सुखी व समाधानी बनवू शकतो. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन खट-उ समन्वयक प्रा. डॉ. अयोध्या पवळ तर आभारप्रदर्शन प्रा. शिल्पा ससाणे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्यास आता एक वर्ष कैद

### कायद्याचा धाक वाढविण्यासाठी कडक शिक्षेची तरतूद, विधिमंडळात बहुमताने विधेयक मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सार्वजनिक अथवा जनतेस पाहण्यासाठी खुल्या असलेल्या कोणत्याही मालमत्तेचे विद्रुपीकरण अथवा विध्वंस करण्यास प्रतिबंध व्हावा, यासाठी असलेल्या शिक्षेच्या तरतुदींमध्ये वाढ करण्याचा निर्णय विधिमंडळाने घेतला. अशा प्रकारच्या अपराधास आता एक वर्ष कारावासाची कैदेची शिक्षा आणि वीस हजार रुपयांचा दंड अशी तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक मालमत्तेच्या विद्रुपीकरणाच्या घटना वारंवार घडत असतात. हा कायद्याने अपराध असला, तरी यासाठीच्या शिक्षेची तरतूद ही अत्यंत कमी म्हणजे तीन महिने कारावास आणि दोन हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा होती. ही शिक्षा अत्यंत कमी असल्याने, नागरिकांवर याचा धाक नव्हता. त्यामुळे या शिक्षेच्या तरतुदीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतचे विधेयक आज विधिमंडळात बहुमताने मंजूर करण्यात आले. यापुढे सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान किंवा विद्रुपीकरण करणाऱ्या अपराध्यास एक वर्ष कारावास आणि वीस हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. संबंधित अपराध जर आपसांत मिटविण्यात आला तर अशा अपराध्याच्या बाबतीत कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही. याबाबतचा खटला सुरू असेल आणि अपराधी जर कोठडीत असेल तर अपराध आपसांत मिटविण्यात आला, तर अपराध्याची कोठडीतून मुक्तता करण्यात येईल अशी तरतूदही यात करण्यात आली आहे.

## पान १वरून...

### मोदी सरकार २३ जुलै रोजी

काही मोठी घोषणा करतील अशी शक्यता आहे. केंद्र सरकार केंद्रीय अर्थसंकल्पात ग्रामीण घरांसाठी राज्य अनुदान वाढवण्याची तयारी करत आहे, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ५० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे.

---------------

### ...तर २८८ पैकी तुमचा एकही

आभार मानतो, असे म्हणत जरांगेंनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. एकट्या छगन भुजबळांचे ऐकून मराठ्यावर अन्याय केला तर याद राखा, असा इशारा जरांगेंनी आपल्या भाषणातून दिला. भुजबळांचे ऐकून जर मराठयांवर अन्याय केला तर २८८ मतदारसंघातून सरकारचा एक ही उमेदवार निवडून येऊ देणार नाही, असे जरांगे आपल्या भाषणात म्हणाले. सरकारने मराठ्यांचा आक्रोश समजून घ्यायला हवा. छगन भुजबळांचे ऐकून जर अन्याय केला तर लोकसभेची पुनरावृत्ती होईल. पुन्हा मला म्हणायचे नाही, असे कसे झाले. मग मांडीला मांडी लावून बसतात आणि म्हणतात पाटील फक्त पाडा म्हणून नका. पाडा मराठे म्हटले तर तुमची ही अवस्था झाली, असा टोला जरांगेंनी सत्ताधाऱ्यांना लगावला आहे.

------------

### पक्ष कोणाचा? चिन्ह कोणाचे?

असीम सरोदे म्हणाले की, विधानसभा निवडणुका ऑक्टोबर नोव्हेंबरच्या दरम्यान होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचं? याबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालावर दोन्हीही पक्षाच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलेल आहे. एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष फोडून राज्यपाल आणि राहुल नार्वेकर यांच्या मदतीने तो पक्ष पळवला आणि राहुल नार्वेकर यांनी सुद्धा निकाल एकनाथ शिंदे यांच्या बाजुने दिला आहे. हे सर्व निकाल सर्वोच्च न्यायालयामध्ये चॅलेंज करण्यात आलेले आहेत. या सर्वाचा निकाल पुढच्या दोन ते तीन महिन्यात येण्याची शक्यता आहे. ते पुढे म्हणाले की, 'विधानसभा निवडणुकांच्या आधीच पक्ष कोणाचा? चिन्ह कोणाचं?. पक्षाचे मूळ बांधणी करणारे कोण? याचा निकाल लागणार आहे. त्यामुळे खरं कोण आणि खोटे कोण याचा सुद्धा निकाल सुप्रीम कोर्टाकडून अपेक्षित आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने एकनाथ शिंदे यांच्या प्रकरणावरती जो निकाल दिलेला आहे, तो निकाल अत्यंत दुर्गामी परिणाम करणार आहे. त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राहुल नार्वेकर विधानसभा अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडे दिली होती. परंतु त्यांनी कायद्याच्या चौकटीत बसणारा निर्णया न देता, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची अवहेलना केलेली आहे. त्यांनी भारतीय संविधाना सोबत फ्रॉड केलेला आहे, असे सरोदे म्हणाले.

---------------

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, चिन्ह

पवार गट असे दोन गट निर्माण झाले. यानंतर दोन्ही गटांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आमचाच असा दावा केला. हा वाद पुढे निवडणूक आयोगात गेला. आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे घड्याळ चिन्ह हे अजित पवारांकडे देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. यावर पुढील सुनावणीसाठी १६ जुलै ही संभाव्य तारीख दिली आहे. या प्रकरणात १९ मार्चला सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला नोटीस जारी केली होती आणि चार आठवड्यात त्यांचे उत्तर दाखल करण्यास सांगितले होते. ते अद्याप अजित पवार गटाने दाखल केलेले नाही. अजित पवार गटाच्या उत्तरानंतरच शरद पवार गटाला दोन आठवड्यात रिजॉईंडर दाखल करायचे आहे. कारण त्यांचे रिजॉईंडर हे अजित पवार गटाच्या उत्तरावरील प्रतिसाद असेल.

**दोन्ही गटांत सुनावणीदरम्यान खडाजंगी होण्याची शक्यता**

अजित पवार गटाचे उत्तर जेवढे लांबेल, तेवढेच शरद पवार गटाचे रिजॉईंडर लांबेल, या पार्श्वभूमीवर १६ जुलैला होणाऱ्या सुनावणीपूर्वी अजित पवार गटाच्या वतीने उत्तर दाखल केले जाऊ शकते. मात्र, अजित पवार गटाने आगामी सुनावणीपूर्वी उत्तर दाखल केले नाही. तर यावरून दोन्ही गटात सुनावणीदरम्यान खडाजंगी होऊ शकते, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयातील वकील सिद्धार्थ शिंदे यांनी दिली.

-------------

### महाराष्ट्र ठरले सर्वोत्कृष्ट

परिवर्तनकारी निर्णय घेतले आहेत. यात २१ लाख हेक्टर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठे बांबू मिशन राबविण्याचा निर्णय आहे. यात नंदुरबार येथील धडगांव तालुक्यातील ७० गावच्या सरपंचांनी केंद्रीय फलोत्पादन सचिव प्रभातकूमार यांच्या समोरच आमचा प्रश्न बांबू लागवडीशिवाय सूटणार नाही, अशी मागणी केली. केंद्रानेही त्याला होकार दिला. या वर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री पवार यांनी नंदूरबार जिल्ह्यातील एक लाख २० हजार एकर जमिनीमध्ये केंद्र आणि राज्य मिळून हरित पट्टा निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. या अभियानासाठी अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. याशिवाय सरकारने १२३ प्रकल्पांना मार्गी लावून सुमारे १७ लाख हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा चंग बांधला आहे. नुकत्याच झालेल्या खरीप आढावा बैठकीत मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढीसाठी पेरा आणि प्रत्यक्ष उत्पादन वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांना आदेश दिले गेले आहेत. भारतातील पहिले मायक्रो मिलेट क्लस्टर लातूर जिल्ह्यात सुरु करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. तसा प्रस्तावही केंद्राकडे पाठवण्यात आला आहे. देशातील विविध सहा (महाराष्ट्रासह, राजस्थान, म.प्रदेश, गुजरात, गोवा आणि दमण) राज्यांच्या रब्बी पिकांच्या हमी भावाच्या शिफारशीकरिता मुंबईत केंद्रीय कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष विजयपाल शर्मा यांच्यासोबत बैठक झाली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे अशा बैठकीस उपस्थित राहिले. या दोघांनीही या बैठकीत ठोस अशी भूमिका मांडली आहे. यावेळी केंद्रीय कृषी मुल्य आयोगाच्या अध्यक्षांनी आयोगांची व्याप्ती वाढवण्यासाठी केंद्राला प्रस्ताव पाठविला जाईल, असे सुतोवाच केले.

----------

### बीड सायबर पोलीसांची

जणांच्या मुसक्या आवळल्या. बीड च्या सायबर पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतूक होत आहे. बीड शहरातील डॉ.विठ्ठल क्षीरसागर यांनी ऑनलाइन सोशल मार्केटिंग साइटवर फॉरेक्स ट्रेडिंगसाठी पैस गुतविण्याचे ठरविले होते, यासाठी त्यांना अधिकच्या नफ्याचे आमिष दाखविण्यात आले होते. त्यावेळी १० नोव्हेंबर रोजी क्षीरसागर यांनी ४० हजार रूपये गुंतवणूक केली. त्याचे १५ नोव्हेंबरला ४५ हजार २०० रूपये नफा स्वरूपात मिळाले. त्यामुळे त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर वेगवेगळ्या दिवशी आणखी पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले. एकूण ५७ लाख २० हजार रूपये गुंतवणूक झाल्यावर ४ डिसेंबर २०२३ रोजी त्यांना गुंतवणूक केलेल्या नफ्यावर तुम्हाला ३६ लाख रूपये टॅक्स बसला आहे. तो भरा, असे सांगितले. परंतु डॉ. क्षीरसागर यांनी हे पैसे मिळणाऱ्या नफा रकमेतून कपात करा आणि बाकीचे पैसे परत करा, असा आग्रह धरला. त्यानंतर त्यांनी वारंवार मेसेज केले, परंतु त्यावर काहीच प्रतिसाद मिळाला नाही. यावरून त्यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यांनी ५ जानेवारी २०२४ रोजी तत्काळ सायबर पोलिस ठाणे गाठून फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात तीन व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर सायबर पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. गुह्यातील फसवणुक झालेली काही रक्कम ही मध्यप्रदेश येथील अशोक नगर येथील बँक खात्यामध्ये गेल्याचे निष्पन्न झाले होते. त्यानुसार सायबर पथक हे अशोक नगर मध्यप्रदेश येथे गेले. त्याठिकाणी चार दिवस आरोपीचा कसून शोध घेतला असता आरोपी शिवेन्द्र रनवीर सिंह रघुवंशी वय ३५ वर्ष रा. आमरोद सिंगराना ता. नईसराय जिल्हा अशोक नगर, मध्यप्रदेश हा मिळून आला. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता, त्याने त्याचे साथीदार जयदीप विशवीर रघुवंशी वय २८ वर्ष, राजीव रामबाबु रघुवंशी वय ३२ वर्ष, श्याम सीताराम रघुवंशी आणि प्रमोद रमेशकुमार चौबे वय २५ वर्ष यांची नावे सांगितली. यावेळी बीडच्या सायबर पोलिसांनी स्थानीक पोलीसाच्या मदतीने सर्व आरोपीचा शोध घेवून त्यांना अटक केली. यावेळी त्यांच्याकडून विविध बँकेचे ७७३ डेबीट कार्ड, विविध टेलीकॉम कंपनीचे ५०८ सिमकार्ड तसेच विविध बँकेचे नवीन अकाऊट किट मिळून आले. तसेच आरोपीकडून ५ मोबाईल, ०१ लॉपटॉप, ०१ स्वाईप मशीनही दिसून आले. या सर्व आरोपींना बीड येथे आणण्यात आले आहे. सदर कामगीरी मा. नंदकुमार ठाकुर, पोलीस अधीक्षक बीड सो, मा. सचिन पांडकर अप्पर पोलीस अधीक्षक सो, बीड पोलीस निरीक्षक डी. बी. गात यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक शैलेश जोगदंड, पो.ह. रामदास गिरी, पो.ना. विजय घोडके पो. अं प्रदीप वायभट, पो.अं. अजय जाधव, सर्व सायबर पोलीस स्टेशन बीड यांनी केली.

## इंटरनॅशनल मॅथ ओलंपियाड मध्ये प्रगती विद्यालयाचे यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अतिशय अल्पकाळात नामवंत ठरलेल्या विविध स्पर्धा परीक्षेत नेहमीच राज्याच्या व देशाच्या पटलावर असलेल्या प्रगती विद्यालय बालेपीर बीड या विद्यालयाने मॅथ ऑलिम्पियाड फाउंडेशन गुडगाव दिल्ली मार्फत देशपातळीवर मॅथ ओलंपियाड ची स्पर्धा घेण्यात आली होती त्यामध्ये प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील गोल्ड मेडल प्राप्त गुणवंत यशवंत विद्यार्थी खालील प्रमाणे विद्यार्थी १) शिवप्रसाद मिसाळ२) जानवी सोनसळे३), श्रिया कवडे४) तेजस्विनी तांबडे५) सृष्टी वनवे ६)आदित्य घोळवे ७)तेजस्वी दराडे८) श्लोक मस्के९) मोनाली तांबे१०) संगिनी दहिफळे११) प्रणव सानप१२) श्रावणी माने १३)अभिजीत घोळवे१४) श्रुती तिडके १५)अजित माने १६)चैतन्य बनसोडे१७) सार्थक केदार १८)दिपाली केदार१९) ऋतुजा भोंडवे २०)अरविंद उगले२१) अमृता नागरगोजे वरील सर्व गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रगती संस्थेचे संस्थापक आदरणीय रामकृष्ण जी बांगर साहेब सचिव सत्यभामाताई बांगर बाळासाहेब बांगर विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळघरे सर कंठाळे सर शेख सर ढवळेसर घोळवे सर सानप सर कदम सर जायभाय सर अग्रवाल मॅडम मस्के सर खेडकर सर वाघवालेसर कंठाळे सर ढाकणेसर आधापुरे सर व सर्व मॅडम शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी वरील गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणा शुभेच्छा दिल्या.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. ०७ जुलै २०२४



## लाडनांदरा येथील वारकऱ्याला अज्ञात वाहनाने उडवल्याने जागीच मृत्यू

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गा हा पायी दिंडीमार्ग म्हणून ओळखला जातो या दिशेने पंढरपूरला आषाढी पायी दिंडी सोहळ्यासाठी दररोज या रस्त्यावरून हजारो वारकरी चालतात दिनांक ५ जुलै शुक्रवार रोजी तेलगाव धारूर रस्त्यावर सुंदर नगर कारखाना या ठिकाणी चालत असलेल्या वारकऱ्याला अज्ञात वाहनाने उडवून पळ काढला त्यात त्या वारकऱ्याचे पंढरपूरला जाताना अपघाती निधन झाले या घटनेमुळे सेलू तालुक्यातील लांडनांदरा गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अन्नासाहेब गायकवाड वय ६५ वर्ष असे या वारकऱ्याचे नाव आहे स्व.अण्णासाहेब गायकवाड यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी पत्नी असा परिवार आहे या प्रकरणाची बीड पोलीस अधीक्षक यांनी दखल घेऊन आज्ञात वारकऱ्याला उडून पळ काढणाऱ्या वाहनाचा छडा लावून चालकावर योग्य ती कारवाई करावी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी यावारकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत जाहीर करावी अशी मागणी लाडनांद्रा येथील ग्रामस्थ व वारकऱ्यातून केली जात आहे.

# जिल्ह्यातील महायुती व महाविकास आघाडीमुळे मतदार संघाची अदलाबदल होणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला दणदणीत यश मिळाल्याने विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी अधिक प्रभावीपणे पुढे आली आहे. लोकसभा निवडणुकीमुळे महाविकास आघाडीचा उत्साह वाढलेला आहे. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघाचे समीकरण बदलले आहे. येणार्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मोठे बदल पहावयास मिळणार आहेत. मतदार संघाचीसुद्धा अदलाबदल केली जाणार आहे. महायुतीमध्ये भाजपाला जे पोषक मतदार संघ आहेत. ते भाजपला सोडले जातील तर अजितदादा पवार गटाला जे पोषक आहेत. ते राष्ट्रवादीला सोडले जाणार आहेत. तसेच महाविकास आघाडीमध्ये सुद्धा दिसून येते.

लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे महाविकास आघाडीमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. जर महाविकास आघाडीला यश मिळाले नसते तर महाविकास आघाडी बर्हिवक्र भिंगाने शोधावी लागली असती. परंतु एका निवडणुकीने सारा चमत्कार घडवून आणला आहे. महायुतीला महाराष्ट्रात अपयश आले असून आता महायुतीमध्ये तीन पक्ष एकत्र आल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुळात पहिला प्रश्न असा की, जागा कोणाला किती सुटणार? दुसरा प्रश्न मिळालेल्या जागांवर महायुतीतील घटक पक्ष समाधानी होणार का? तिसरा प्रश्न कोणती जागा कोणाला? यावर एकमत होणार का? चौथा प्रश्न एकमत झाले तर त्या ठिकाणी होणारी बंडखोरी थोपविली जाणार का? असे एक ना अनेक प्रश्न महायुती आणि महाविकास आघाडीच्या समोर उभे ठाकणार आहेत. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघात सुद्धा अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघातील महायुतीचे जागा वाटप कसे असणार? किंवा महाविकास आघाडीतील तीनही पक्षांना कोणत्या जागा सुटणार याची उत्सुकता लागलेली आहे. येणार्या काही दिवसांमध्ये या प्रश्नांचे उत्तर मिळणार आहे. विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यानंतर जागा वाटपाच्या व इतर निश्‍चितीच्या मॅरेथॉन बैठका होणार आहेत. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघ आहेत. त्यापैकी सध्या चार विधानसभा मतदार संघावर राष्ट्रवादीचा प्रभाव आहे. त्यापैकी तीन मतदार संघावर अजित पवार गटाचा प्रभाव आहे. तर बीड विधानसभा मतदार संघावर शरद पवार गटाचा प्रभाव आहे. भाजपाचा प्रभाव हा केज आणि गेवराई मतदार संघावर आहे. हाच विजयासाठीचा फॉर्म्युला विधानसभेला राहणार का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. एका एका मतदार संघाचा आढावा घेतला तर अनेक प्रश्न निर्माण होतात. ज्याचे उत्तर पक्षश्रेष्ठीकडे नाही. परळी विधानसभा मतदार संघ हा भाजपा लढवणार नाही. कारण त्या ठिकाणांहून पंकजाताई मुंडे या विधानपरिषदेवर जात आहेत. तर महायुतीमध्ये राष्ट्रवादीने ही जागा जिंकलेली असल्याने त्या ठिकाणी ना. धनंजय मुंडे हे एकमेव महायुतीचे उमेदवार असतील. माजलगाव मतदार संघात विद्यमान आमदार अजित पवार गटाचे प्रकाश सोळंके आहेत. त्या ठिकाणी भाजपाकडून रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, बाबरी मुंडे, केशवराव आंधळे, बाबुराव पोटभरे हे विधानसभेसाठी इच्छुक आहेत. यापैकी आडसकर आणि मोहनराव जगताप हे प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे ते काय भूमिका घेणार की आ. सोळंके यांचा प्रचार करणार याकडे जिल्ह्याचे लक्ष असणार आहे.




गेवराई विधानसभा मतदार संघातून विद्यमान आ. लक्ष्मण पवार हे भाजपाचे आहेत. त्यांच्या मतदार संघातून ३९ हजार मतांची आघाडी राष्ट्रवादीला मिळालेली आहे आणि त्यामुळे त्या ठिकाणी आ. पवार यांनाच ती जागा सुटणार की त्या ठिकाणी राष्ट्रवादीचे माजी आ. अमरसिंह पंडित यांना ती जागा सुटणार अशी चर्चा आहे. त्या ठिकाणी जागा अदलाबदलीच्या फॉर्म्युल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे.

आष्टी-पाटोदा विधानसभा मतदार संघ हा सध्या राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे आहे. त्या ठिकाणी त्यांच्याकडेच राहिल का? असा प्रश्न आहे. कारण त्या ठिकाणांहून आ. सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे त्या ठिकाणी इच्छुक उमेदवार आहेत. आष्टीने लोकसभेला जेमतेम आघाडी देण्याचा प्रयत्न केला आहे. ही जागा भाजपाला सुटणार अशी चर्चा आहे. कारण आष्टीची जागा भाजपाला तर गेवराईची जागा राष्ट्रवादीला सुटणार ही चर्चा अनेक दिवसांपासून सुरू आहे. त्या ठिकाणी आ. सुरेश धस किंवा त्यांचे पुत्र जयदत्त धस यांना भाजपकडून उमेदवारी मिळू शकते. त्या ठिकाणी आ. बाळासाहेब आजबे व धोंडे यांची भूमिका कशी असेल हे येणार्या काळात दिसणार आहे.

बीड विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार हे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडे आहेत. त्या ठिकाणी शिवसेना ठाकरे गट इच्छुक आहे. कारण आजवर शिवसेनेने ती जागा लढवलेली आहे आणि सुटलेली आहे. यंदा उद्धव ठाकरे गटाकडून इच्छुक उमेदवार नाहीत. परंतु शिवसेना शिंदे गटाकडून अनिल जगताप हे इच्छुक आहेत. तसेच भाजपकडून जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के हे सुद्धा इच्छुक आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून युवानेते डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर यांच्या नावाची चर्चा आहे. त्यामुळे महायुतीमध्ये ही जागा कोणाला सुटते? याकडे लक्ष असणार आहे.

केज विधानसभा मतदार संघातून विद्यमान आ. नमिता मुंदडा या भाजपच्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून व शिवसेना शिंदे गटाकडून कोणी इच्छुक आज तरी नाही. परंतु महाविकास आघाडीकडून ही जागा शरद पवार गटाला सुटणार असल्याने माजी आ. पृथ्वीराज साठे यांचा दावा प्रबळ असणार आहे. तसेच सौ. मनिषा गोकुळ जाधव या सुद्धा शरद पवार गटाकडून इच्छुक उमेदवार आहेत. त्या सोबतच माजी आ. प्रा. संगिताताई ठोंबरे, डॉ. सौ. अंजलीताई घाडगे, डॉ. नयना सिरसाट या इच्छुक उमेदवार आहेत. या ठिकाणची लढत भाजपविरुद्ध राष्ट्रवादी शरद पवार गटामध्ये होणार आहे. हे जरी आजचे चित्र असले तरी येणार्या काळामध्ये बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल होणार आहेत. भाजपाला किती जागा सुटणार, राष्ट्रवादी अजित पवार गट किती जागा लढणार? लढवणार्या जागांवर ते समाधानी राहतील का? किंवा स्वतंत्ररित्या सर्वच पक्ष निवडणुका लढवतील का? असे अनेक प्रश्न उपस्थित होणार आहेत. महाविकास आघाडीचा विचार केला तर जिल्ह्यात केवळ शरद पवार गटाचा एकमेव आमदार बीडमध्ये आहे. इतर ठिकाणी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गटाचा आमदार नाही. त्यामुळे महाविकास आघाडीतील समिकरण कशा पद्धतीचे असेल. असे महाविकास आघाडीमध्ये तीनही पक्ष कोणत्या जागा मागतील? कोणत्या जागांवर समाधान होईल. असे अनेक तर्क आजपासून लावले जात आहेत. बीड जिल्ह्यातील विधानसभेची निवडणूक रंजक होणार आहे. अनेक मतदार संघाची अदलाबदल होणार आहे, मोठ्या प्रमाणात बंडखोरी होणार आहे. उमेदवारांची पळवापळव होणार आहे. अनेकजणांचे पक्ष प्रवेश होणार आहेत. त्यामुळे येणारे दोन महिने जिल्हावासियांना मनोरंजनाचे जाणार एवढे मात्र खरे.

## हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक जयंती उत्सवात साजरी



**वडवणी । प्रतिनिधी**

छत्रपती राजर्षी शाहु महाराज विद्यालयात हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मु.अ/प्राचार्य. श्री सानप बी.व्ही,प्रमुख पाहुणे श्री. शिंदे बी.ए.सर.,प्रा.रहाडे के व्ही सर होते,,तसेच यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्यांचे विद्यार्थ्यांना अवलोकन करुन दिले,कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री . सानप सरांनी वसंतराव नाईक यांचे जीवन ,त्यांचे कार्य विद्यार्थ्यांना समजुन सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री महानवर एस.बी.सर आणि आभार प्रदर्शन प्रा.सरवदे व्ही.एन. मॅडम यांनी केले,तसेच यावेळी विद्यालयातील शिक्षक,प्राध्यापक वृंद ,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते



**आज मा. सुरेश आण्णा धस यांनी पाटोदा तालुक्यातील श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड येथील पायी दिंडीचे आज पंढरपूर कडे प्रस्थान झाले यावेळी हजारोंच्या संख्येने भाविकांनी यामध्ये सहभाग घेतला असून यावेळी संत वामनभाऊ महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्याचा मान मिळाला यावेळी गहिनीनाथ गडाचे महंत ह भ प श्री विठ्ठल महाराज यांचे विलक्षण नियोजन पाहून भारावून गेलो मानाच्या बैल जोडीची मंदिर प्रदक्षिणा भगव्या ध्वजाने दुमदुमलेली नगरी त्याचप्रमाणे ज्ञानोबा तुकाराम चा जयघोष परिसर दुमदुमून गेला त्यात पावसाच्या हलक्या सरींनी वारकऱ्यांच्या आनंदाला जणू पारावर उरला नाही.यावेळी संत वामनभाऊंच्या समाधीचे दर्शन घेतले पादुकांवर दुग्धाभिषेक जलाभिषेक केला. वारकऱ्यांसोबत काही वेळ पायी चालल्याने मन प्रसन्न झाले. लहान थोर या दिंडीमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे दिसून आले.**

## प्रदेश काँग्रेसने विधान सभेसाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवले

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणुकाची तयारी युध्दपातळीवर सुरू केली सप्टेंबर ऑक्टोबर मद्ये होत असलेल्या विधान सभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा अध्यक्षांना प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारानी १० आगष्ट पर्यंत प्रदेश कार्यालयात संपर्क साधण्या संदर्भात सुचना प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुका या सप्टेंबर आक्टोबर मधे लागणार असल्याने व लोकसभा मधील राष्ट्रीय कॉग्रेस च्या विजया नंतर विधानसभा निवडणुकीच्या आखाडच्यात कॉग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशावरून उपाध्यक्ष व प्रशासन संघटक नाना गावंडे यांनी प्रत्येक जिल्हा अध्यक्ष यांना पत्र आदेश दिले आहेत की जे विधानसभा निवडणूकीसाठी इच्छुक आहेत त्यांनी प्रदेश कार्यालयात १० आगष्ट पर्यत संपर्क साधावा तसेच आपल्या उमेदवारी मागणी अर्ज सादर करावा.असे आदेश राष्ट्रीय कॉग्रेसच्या सर्व जिल्हा अध्यक्ष यांना पक्षाच्या वतीने पत्राद्वारे सुचना दिल्या आहेत.

राष्ट्रीय कॉग्रेस ने लोकसभा निवडणूक मधे अतिशय चांगली कामगिरी करत सर्वात जास्त७ लोकप्रतिनिधी महाराष्ट्रातील कॉग्रेस पक्षाच्या वतीने दिले गेले आहेत. त्यामुळे लोकसभा मध्ये महाराष्ट्रात राष्ट्रीय कॉग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.त्यानुसार विधानसभा निवडणूक मधेही सर्वात जास्त जागा या राष्ट्रीय कॉग्रेसला निश्चितच अपेक्षित असल्याचे विज्ञान व तंत्रज्ञान सेलचे प्रदेश प्रमुख सुरेश यादव यांनी सांगितले असून आता विधानसभेतही राष्ट्रीय कॉग्रेसच सर्वात मोठा पक्ष असणार आहे असेही ते म्हणाले. त्यामुळे राष्ट्रीय कॉग्रेसच्या विधानसभा लढवण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारानी प्रदेश कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे . ज्यांचे उमेदवारी मागणी अर्ज येतील त्यांचाचा विचार पक्षाकडून होईल असेही सांगण्यात आले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे, खासदार आदरणीय बजरंग बप्पा सोनवणे , जिल्हा बीड ,यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने , राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष तालुका पाटोदा यांच्या वतीने, जिल्हा परिषद कन्या शाळा पाटोदा येथे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले !

## चिंचोटी येथे सरपंच भागवत गोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील तरुण तडफदार युवा सरपंच भागवत गोंडे यांचा वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांच वाटप.वृक्षरोपण,तसेच विविध विकास कामांचे उद्घाटन ही गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

आपण अनेक वेळा आपण पाहतो की अनेकजन आपला वाढदिवस वेगवेगळ्या पद्धतीने जो तो साजरा करत असतो.परंतु गावचे युवा सरपंच भागवत गोंडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कसल्याही प्रकारचा अपव्यय खर्च न करता फक्त आपले गाव आणि आपल्या गावचा विकास करण्याचे ध्येय मनामध्ये ठरवून गावातील सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन त्यांनी आपल्या सरपंच पदाच्या कार्यकाळातील हा पहिल्याच वाढदिवसाचे औचित्य साधून गावात विविध विकास कामाचे कामांचे उद्घाटन वृक्षरोपण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा वाटप करून आपला वाढदिवस शाळेतील चिमुकल्या सोबत साजरा केला.प्रथम संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने व शाळेच्या वतीने सरपंच भागवत गोंडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.आपल्या सरपंच पदाच्या कारा किर्दीच्या आठ महीण्याच्या कालावधीमध्ये गावात पथदिवे बसवणे,सार्वजनिक स्वच्छालय उभारणे,दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पेवर ब्लॉक बसवणे,अंडरग्राउंड नाली तयार करणे, सिमेंट रस्ते तयार करणे,आदी विकास कामे केली आहेत.त्यांनी शुक्रवार दि ५ जुलै रोजी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,शाळेच्या ग्राउंड ला पेवर ब्लॉक व कंपाउंड वॉल चे उद्घाटन,गावात अंडरग्राउंड नाल्यांची उद्घाटन,गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले.यावेळी ग्रामसेवक सत्यवान काशीद,अशोकराव गोंडे गणेश बापू गोंडे तुकाराम काकडे संतराम आबा गोंडे मुरली येळवे गोरख तात्या गोंडे धर्मराज जाधव उपसरपंच गोविंद गोंडे,मुख्याध्यापक नांदे सर शालेय समितीचे अध्यक्ष साहेबराव गोंडे सर्व ग्रामपंचायत सदस्य सर्व शिक्षक व्रंद गावातील तरुण युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.उपस्थित सर्वांच्या आभार सरपंच भागवत गोंडे यांनी मानले.




## सातशे विद्यार्थ्यांना मिळणार शैक्षणिक साहित्याचा आधार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीच्या उपक्रमांतील ७०० वंचित घटकातील विद्यार्थ्यांना रविवारी मान्यवरांच्या उपस्थितीत शैक्षणिक साहित्याचे किट लोकसहभागातून वाटप होणार आहेत. अशी माहिती या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी दिली.

येथील नागझरी परिसरातील माईर्स एम आय टीच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास गोव्याचे लोकायुक्त अंबादासराव जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक तुळशीराम कराड हे राहणार आहेत. पुण्यातील



**आधार माणुसकीचा उपक्रम, मान्यवरांची उपस्थिती**

मराठवाडा मित्रमंडळाचे कार्यकारी अध्यक्ष भाऊसाहेब जाधव, गंगामाऊली शुगरचे मुख्य प्रवर्तक लक्ष्मणराव मोरे, एम आय टीच्या संचालिका शुभांगी राजेश कराड, नगर पालिकेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, लातूरचे श्वसन व छाती विकार तज्ज्ञ डॉ. रमेश भराटे, लातूर येथील पत्रकार विनोद चव्हाण, घुगे हार्ट केअरच्या संचालिका सारिका नवनाथ घुगे, स्त्री रोग तज्ज्ञ रेखा प्रल्हाद गुरव, डॉ. प्रांजली रमेश लोमटे, डॉ. सोनाली अनिल मस्के, दिपाताई बबन लोमटे, रक्षा धनराज सोळंकी, मुंबईच्या केईएम हॉस्पिटलचे समाज विकास अधिकारी राजेश कांबळे, अथर्व डेव्हलपर्सचे बालासाहेब कदम, सुप्पा येथील अमृत बेकरीचे संचालक गणेश मुंडे, समाजसेवक प्रा. संदिपान मोरे, रामकृष्ण पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यांना मिळणार आधार

मागील ७ वर्षापासून (२०१७) बीड व लातूर जिल्ह्यातील वंचित कुटुंबांना आधार माणुसकीच्या उपक्रमाद्वारे १५० गावांमधील शेतकरी आत्महत्याग्रस्त, एचआयव्ही- कोविडग्रस्त अशा वंचित ५०० कुटुंबांतील ७०० मुलांना शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्याचा आधार दिला जातो. या कुटुंबातील महिलांना साडीचोळी भेट दिली जाते. राज्याच्या विविध जिल्ह्यांतील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या उच्च शिक्षणासाठी लागणारा निधी समाजसेवी संस्थांकडून उपलब्ध करून या विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचे कामही या उपक्रमांतर्गत चालते.

एमआयटीच्या सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आधार माणुसकीच्या परिवाराने केले आहे.

पान ६ वरून...

## काँग्रेस कमिटीने घेतली

विचाराने प्रेरित होऊन काँग्रेस पक्ष न्याय गॅरंटी कार्ड जनतेमध्ये जाऊन उत्कृष्ट प्रचार प्रसार कार्य सातत्यपूर्ण केल्याबद्दल मान्यवरांनी सेल विभाग प्रदेश प्रमुख यांचे अभिनंदन केले. विज्ञान तंत्रज्ञान कौशल्य विभागाचे प्रदेश प्रमुख सुरेश यादव यांनी व त्यांच्या राज्यातील टीम ने महत्वपूर्ण योगदान दिल्या बद्दल सुरेश यादव यांना सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यादव यांनी लोकसभा निवडणूकी मधे पूर्ण वेळ काम केले होते. काँग्रेस पक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची नोंद घेते यातून दिसून आले.यादव यांना विशेष सन्मानित करण्यात आल्या बदल सर्वत्र अभिनंदन होत आहे. काँग्रेस पक्ष दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांची फौज निर्माण करत आहे.यातून निश्चितच दिशादर्शक कार्यक्रम समजून येत आहे. अशा भावना कार्यकर्त्यांनी बोलून दाखवल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचलन सेल विभाग मुख्य संयोजिका प्रज्ञाताई वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन माथाडी कामगार विभागाचे प्रदेश प्रमुख छगन पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेखाताई बांदिवडेकर,राहुल पाटील,अर्चना बनकर,अशोक लांडगे यांनी प्रयत्न केले.

cmyk

# नॅनो खतावर ५०% अनुदान देणारी केंद्र सरकारची योजना आजपासून सुरू

## शेतकऱ्यांनो, लाभ घेण्यासाठी 'हे' करा!




पुणे : केंद्र सरकारने नॅनो खतांवर ५०% अनुदान देणारी योजना ६ जुलैपासून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी या योजनेचे उद्घाटन गांधीनगर येथे आयोजित कार्यक्रमात केले. रासायनिक खताच्या अति वापरामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा धोका कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना स्वस्त दरात खते उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

योजनेची उद्दिष्टे : नॅनो खतांचा वापर वाढवून रासायनिक खतांचा वापर कमी करणे. मृदा, हवा आणि पाणी प्रदूषण कमी करणे. शेतकऱ्यांना कमी किमतीत खते उपलब्ध करून देणे. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत करणे

योजनेची वैशिष्ट्ये : या योजनेचा लाभ देशभरातील सर्व शेतकऱ्यांना मिळेल. नॅनो खतांवर ५०% पर्यंत अनुदान दिले जाईल. एजीआर -२ नावाची ही योजना चालू आर्थिक वर्षासाठी राबवली जाईल. या योजनेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी १०० दिवसांची विशेष मोहीम राबवली जाईल.

केंद्र सरकारचे प्रयत्न : केंद्र सरकार शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. नॅनो खत अनुदान योजना याच दिशेने टाकलेले पाऊल आहे. या योजनेमुळे नक्कीच शेतकऱ्यांना आणि पर्यावरणालाही फायदा होईल.

शेतकऱ्यांना काय करावे लागेल? : या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकर्यांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आवश्यक ते कागदपत्रे जमा करणे गरजेचे आहे. नॅनो खते खरेदी करताना अधिकृत विक्रेत्यांकडूनच खरेदी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी : शेतकरी अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या कृषी विज्ञान केंद्राशी किंवा कृषी विभागाशी संपर्क साधू शकतात.

# महाराष्ट्रात 'रेड वॉटर सफरचंदाची' शेती यशस्वी

## धुळ्याच्या शेतकऱ्याचे सर्वत्र कौतूक



जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेशातील थंड वातावरणात येणारी लालचुटुक रेड वॉटर सफरचंदाची लागवड महाराष्ट्रातील एका शेतकऱ्यांने यशस्वी करून दाखविली आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील उमर्दा येथील या प्रयोगशील शेतकऱ्याचे नाव आहे जयवंत पाडवी. रेड वाटर सफरचंद लागवडीची ही किमया साध्य झाली ते जयवंत पाडवी यांच्या कुतुहलातून. त्यांनी लावलेली रेड वाटर सफरचंदाची बाग सध्या बहरात आली आहे.

परदेशातील स्ट्रॉबेरी महाबळेश्वरला येते, मग आपल्या शेतात का येणार नाही, असा प्रश्न अनेकांना पडतो. मात्र, दुष्काळी तालुक्यातील उपक्रमशील शेतकऱ्यांनी पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना विविध फळबागा घेतल्या. जयवंत पाडवी यापैकीच एक प्रयोगशील शेतकरी आहेत. महाराष्ट्रात विविध प्रकारच्या फळबागांचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी यशस्वी करून दाखवले आहे. मात्र, रेड वॉटर सफरचंद लागवडीचा प्रयोग आपल्या भागात करायचा, असा चंगच पाडवी यांनी बांधला. त्यासाठी त्यांनी गुगल, युट्यूबवर बराच काळ रेड वॉटर सफरचंदाच्या (पाणी सफरचंद) शेतीचा अभ्यास केला. रेड वॉटर सफरचंदाची लागवड डिसेंबर महिन्यात करावी, असा त्यांना हिमाचल प्रदेशातील शेतकऱ्यांनी सल्ला दिला. गेल्यावर्षी ग्रामीण भागात आंध्र प्रदेशातील विक्रेते फळझाडे व फुलझाडे विक्रीसाठी आले असता पाडवी यांनी त्यांना रेड वॉटर सफरचंदाबाबत सांगितले. त्यानुसार तेथील विक्रेत्यांशी संपर्क करून त्यांनी तेथील रोप वाटिकेतून रेड वॉटर सफरचंदाची रोपे उपलब्ध करून दिली. आपल्या परिसरात ही फळे येत नाहीत, असे बऱ्याच स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांना सांगितले. पण त्यांनी सर्वांनी दिलेला सल्ला बाजूला ठेवत मोठ्या धाडसाने ऐन उन्हाळ्यात रोपांची लागवड केली. युट्यूब, शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनातून झाडांची चांगली निगाही राखली.

एका झाडापासून आठ ते दहा किलो सफरचंद : लागवडीनंतर ११ ते १३ महिन्यांनी रेड वॉटर सफरचंदाच्या झाडाला फळधारणा झाली आहे. सातपुड्यातील डोंगरात उमर्दा येथे सध्या लालचुटुक रेड वॉटर सफरचंद फुलली आहेत. सुमारे १०० ग्रॅम वजनाची सफरचंदे झाडांना लागली आहेत. फळांची गोडी देखील चांगली आहे. यंदा एका झाडापासून अंदाजे आठ ते दहा किलो रेड वॉटर सफरचंद मिळाली.

पाडवी यांनी अर्धा एकर क्षेत्रात फणसाची झाडे लावली आहेत. पाडवी यांनी पारंपरिक शेती न करता यापूर्वीही वेगवेगळे प्रयोग केले आहेत. त्यांनी शेती विषयक अनेक प्रयोग केले. त्यामधील काही यशस्वी झाले, तर काहीत नुकसानही सोसावे लागले आहे. हे रेड वॉटर सफरचंद बाजारात उपलब्ध झाल्यानंतर लाखोंचा नफा होणार असल्याचे ते सांगतात.

# कोरडवाहू फळझाडांना द्या संतुलित खते

फळझाडांच्या लागवडीचे यशापयश हे जमीन, हवामान, खत व्यवस्थापन आणि पाणी पुरवठा यावर विशेष अवलंबून आहे.यापैकी खत व्यवस्थापनास अन्यन साधारण महत्व आहे. फळझाडांची लागवड केल्यानंतर नियमित आणि भरपूर उत्तम दर्जाची फळे येण्यासाठी जमीन सुपीक ठेवणे जरुरीचे आहे.

फळ झाडांना खते देण्याची योग्य वेळ : सर्वसाधारणपणे फळझाडांना जून-जुलै, सप्टेबर-ऑक्टोबर व जानेवारी - फेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्व होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत.सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत,संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

फळझाडांना खते देण्याची पद्धत : खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा.प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा.

सिताफळ : पूर्ण वाढलेल्या (४ वर्ष +) झाडास ३० ते ४० किलो शेणखत,५५०:१२५:१२५ ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( ५५० ग्रॅम युरिया, ८०० ग्रॅम एसएसपी व २०० ग्रॅम एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे. शेणखताबरोबर अॅझोस्पिरीलम व पीएसबी या जीवाणू खतांचा वापर करावा.

बोर : पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत ५० किलो प्रती झाडास छाटणी नंतर द्यावे. २५:२५०:५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( अर्धा किलो युरिया, दीड किलो एसएसपी व एक किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

आवळा : पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर ) झाडास ५० किलो शेणखत ५००:२५०:२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( १ किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

जांभूळ : पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर ) झाडास ५० किलो शेणखत ५००:२५०:२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( १ किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.

चिंच : पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर) झाडास ५० किलो शेणखत ५०० : २५० :२५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश प्रती झाड( एक किलो युरिया, दीड किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे. कवठ : पूर्ण वाढलेल्या (५ वर्ष व नंतर) झाडास ५० किलो शेणखत ३५० : २५०: २५० ग्रॅम नत्र: स्फुरद: पालाश (पाऊण किलो युरिया, दीड किलो किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी) प्रती झाड प्रती वर्ष द्यावे. नत्र दोन समान हफ्त्यात विभागून द्यावे.



# शेतीमध्ये वर्मीवॉश वापरण्याचे फायदे



वर्मीवॉश हे एक प्रकारचे द्रव स्वरूपातील सेंद्रिय खत आहे. हे द्रव गांडूळ आणि शेणखत यांच्या पासून बनवले जाते. गांडूळ खत भिजवल्यानंतर मिळणारे द्रव हे वनस्पतीसाठी पोषक असते, तसेच सूक्ष्मजीव आणि ह्युमिक पदार्थांनी समृद्ध असते, त्यामुळे ते एक प्रभावी खत आहे.

वर्मीवॉश तयार करण्याची पद्धत : आपण २५० लिटर क्षमतेच्या काँक्रीट किंवा प्लास्टिक बॅरलपासून बनवलेल्या मोठ्या कंटेनरमध्ये वर्मीवॉश युनिट तयार करू शकतो. निवडलेल्या कंटेनरच्या तळाशी एक छिद्र पाडून घ्यावे. नंतर बॅरलच्या तळाशी १० ते १५ सेमी किंवा कंटेनरच्या १० ते १५% उंचीपर्यंत रेती किंवा विटांचे तुकडे भरावे. कंटेनरमध्ये १० ते १५ सेंटीमीटर किंवा १०-१५% उंचीपर्यंत खडबडीत वाळूसह आणखी एक थर जोडावा. नंतर वाळूच्या या थरावर गवत ठेवावे. मग यामध्ये चांगला कुजलेला सेंद्रिय कचरा किंवा शेण (१० दिवस जुने) टाकावे व ते नंतर ओले करून घ्यावे. वर्मीवॉश कंटेनरमध्ये सुमारे १००० ते १५०० किशोर किंवा प्रौढ गांडुळे सोडा आणि वर्मीवॉश युनिटमध्ये नियमित ओलावा ठेवावा. वर्मीवॉश मिळविण्यासाठी, त्याच्या मध्यभागी एक छिद्र असलेल्या लहान बादलीतून सतत पाणी काढून घ्यावे. छिद्रांमध्ये कापुस किंवा बांबूच्या काड्या ठेवा जेणेकरून पाणी खाली येईल. फिल्टर युनिटद्वारे पोषक तत्वे वाहून नेणाऱ्या कंपोस्ट द्वारे पाणी हळूहळू तळाशी झिरपते. कंटेनर दररोज ४ ते ५ लिटर पाण्याने भरा. ७ ते १० दिवसानंतर, व्हर्मीवॉश कंटेनरमध्ये तयार होते. १५ दिवसांत सुमारे ३५ ते ४० लिटर व्हर्मीवॉश तयार होऊ शकते. गोळा केलेले वर्मीवॉश थंड आणि कोरड्या जागी साठवले पाहिजे. आता तयार झालेले वर्मीवॉश तुम्ही पिकावर फवारणी किंवा आळवणीसाठी वापरू शकता.

वर्मीवॉश वापरण्याचे फायदे : वर्मीवॉश हे १००% सेंद्रिय आणि पर्यावरणास अनुकूल आहे. त्यामुळे सेंद्रिय शेतीमध्ये हे मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. याच्यामुळे मातीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारते व मुख्य आणि सूक्ष्म पोषक घटकांची पातळी देखील सुधारते. हे पिकाच्या आणि त्यांच्या निरोगी मुळांच्या वाढीस अतिशय उत्तम आहे. वर्मीवॉश हे सेंद्रिय एक कीटकनाशक म्हणून देखील वापरले जाऊ शकते. याचा जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकवून ठेवण्यामध्ये देखील खूप मोठा वाटा आहे. वर्मीवॉशमुळे काही घातक बुरशी देखील कंट्रोल होतात.

वर्मीवॉश वापराचे प्रमाण : याचा वापर आपण फवारणी किंवा आळवणी अशा दोन्ही पद्धतीने करू शकतो. फवारणीसाठी १ लीटर वर्मीवॉश १० लीटर पाण्यात मिसळून वापरावे. आळवणीसाठी २० लीटर वर्मीवॉश २०० लीटर पाण्यात मिसळून एक एकर साठी ड्रिप किंवा आळवणी द्वारे वापरावे.

वर्मीवॉश वापरताना कोणती काळजी घ्यावी : हे १००% सेंद्रिय असल्यामुळे यामध्ये कोणताही रासायनिक घटक मिसळू नये. वर्मीवॉश दीर्घकाळ साठवून ठेऊ नये. तयार झाल्यानंतर १५ दिवसाच्या अंत याचा वापर करावा. तयार झालेले वर्मीवॉश थंड किंवा कोरड्या जागी ठेवावे. भर उन्हात किंवा मोकळ्या हवेत याची साठवणूक करू नये. शक्यतो वर्मीवॉश हे सेपरेट वापरावे, यामध्ये इतर कोणताही घटक मिसळू नये.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४५६ : मृत्यूच्या २५ वर्षांनंतर जोन ऑफ आर्कला निर्दोष ठरवले.
१५४३ : फ्रेन्च सैन्याने लक्झेंबर्गचा ताबा घेतला.
१७६३ : बंगालचे नवाब मीर जाफर यांना पुन्हा बंगालच्या गादीवर बसविण्यात आलं.
१७९९ : रणजितसिंहच्या सैन्याने लाहोरला वेढा घातला.
१८५४ : कावसजी नानाभॉय दावर यांनी मुंबईत पहिली कापडगिरणी सुरू केली. मुंबई ही कापड उद्योगाची राजधानी असली तरी भारतातील पहिली कापडगिरणी मात्र भडोच येथे तर महाराष्ट्रातील पहिली कापड गिरणी नागपूरला सुरू झाली होती.
१८५४ : बॉम्बे स्पिनिंग अँड वेअविंग मिल स्थापना.
१८९६ : मुंबईच्या फोर्ट भागातील एस्प्लनेड मॅन्शन या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील वॉटसन हॉटेलमधे ऑगस्ते व लुई या ल्युनिअर बंधूंनी भारतात पहिल्यांदाच चित्रपट दाखवला.
१८९८ : हवाई बेटांनी अमेरिकेचे सार्वभौमत्व मान्य केले. मात्र, त्यांना अमेरिकेचे राज्य हा दर्जा मिळण्यासाठी पुढे ६० वर्षे वाट पाहावी लागली.
१९१० : इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे आणि खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांनी पुणे येथे भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना केली.
१९४१ : दुसरे महायुद्ध अमेरिकन सैन्याचे आइसलँडमधे आगमन झाले.
१९४८ : दामोदर घाटी निगम ची स्थापना करण्यात आली.
१९४८ : स्वतंत्र भारतातील पहिली बहुउद्देशीय परियोजना सुरु झाली.
१९७८ : सॉलोमन बेटांना (इंग्लंडकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९८५ : विम्बल्डन पुरूष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९८ : इन्डिपेन्डन्स चषक तिरंगी क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेविरुद्ध खेळताना सचिन तेंडुलकरने वेस्ट इंडिजच्या डेसमंड हेन्सच्या एकदिवसीय सामन्यातील १७ शतकांची बरोबरी केली. तसेच एकदिवसीय सामन्यातील ७००० धावांचा टप्पा पार केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०५३ : शिराकावा जपानी सम्राट (मृत्यू: २४ जुलै ११२९)
१६५६ : शीख धर्माचे आठवे गुरु गुरू हर क्रिशन यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १६६४)
१८४८ : ब्राझीलचा राष्ट्राध्यक्ष फ्रान्सिस्को दि पॉला रॉद्रिगेस आल्वेस यांचा जन्म.
१७५२ : जोसेफ मॅरी जाकॉर्ड जॅक्कार्ड लूमचे शोधक (निधन: ७ ऑगस्ट १९३४)
१८५४ : पॅन-इस्लामिक चळवळीचे कार्यकर्ता व भारतीय क्रांतिकारक अब्दुल हाफिज मोहम्मद बराकतउल्ला यांचा जन्मदिन.
१८८३ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार व भारतीय हिंदी, संस्कृत, प्राकृत आणि पाली भाषेचे लेखक व अभ्यासक चंद्रधर शर्मा गुलेरी यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते आणि दक्षिण भारतातील राजकारणी काला वेंकट राव यांचा जन्मदिन.
१९१४ : अनिल बिस्वास प्रतिभासंपन्न संगीतकार (मृत्यू: ३१ मे २००३)
१९२३ : प्रा. लक्ष्मण गणेश जोग कथाकार, कादंबरीकार, समीक्षक (मृत्यू:)
१९२६ : आनंद मोहन झुत्शी गुलजार देहलावी उर्दू कवी, अभ्यासक आणि पत्रकार (निधन: १२ जून २०२०)
१९३४ : भारतीय राजकारणी व मध्यप्रदेश राज्याचे विधानसभा सदस्य राघवजी यांचा जन्मदिन
१९३८ : भारतीय चित्रपट, दूरदर्शन मालिका व रंगमंच नायिका पदमा चव्हाण यांचा जन्मदिन.
१९४७ : राजे ग्यानेंद्र नेपाळ नरेश
१९४८ : पद्मा चव्हाण चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री, स्त्रीसौंदर्याचा एक अनोखा नमुना म्हणून ख्याती असलेल्या पद्मा चव्हाणांच्या नाटकांच्या जाहिरातींत त्यांच्या नावाआधी 'मादक सौंदर्याचा अॅटम बॉम्ब' असे छापले जात असे. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९९६)
१९६२ : 'स्वरचंद्रिका' पद्मजा फेणाणी
१९७० : भारतीय क्रिकेटपटू मिस्टर पटेल यांचा जन्म.
१९७३ : भारतीय गायक-गीतकार आणि दिग्दर्शक कैलाश खेर यांचा जन्म.
१९८१ : भारतीय क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांचा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३०७ : एडवर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (जन्म: १७ जून १२३९)
१५७२ : पोलंडचा राजा सिगिस्मंड दुसरा ऑस्टस यांचे निधन.
१९३० : सर आर्थर कॉनन डॉइल स्कॉटिश डॉक्टर व 'शेरलॉक होम्स' या गुप्तहेरकथांचे लेखक (जन्म: २२ मे १८५९)
१९६५ : इस्रायलचे दुसरे पंतप्रधान मोशे शॅरेट यांचे निधन.
१९८२ : भारतीय गुरू आणि धार्मिक लेखक बॉन महाराजा यांचे निधन. (जन्म: २३ मार्च १९०१)
१९९९ : भारतातील सर्वोच्च शौर्य पराक्रम पुरस्कार परमवीर चक्र पुरस्कार सन्मानित माजी भारतीय सैन्य दल अधिकारी कॅप्टन विक्रम बत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय क्रिकेट खेळाडू एम. एल. जयसिंहा यांचे निधन.
२००७ : प्रसिद्ध ब्रिटीश सैन्य अधिकारी मेजर आयन मेलविले कॅल्व्होकॉरेसी यांचे निधन.
२०११ : भारतीय हिंदी आणि मराठी चित्रपट व दूरदर्शन मालिका कलाकार रसिका जोशी यांचे निधन.
२०२१ : प्रसिध्द अभिनेते दिलीप कुमार यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी निधन

# ठेवीदारांचा गेवराई पोलीस स्टेशनवर अडीच तास ठिय्या

## पूजा मोरेंचा जलसमाधीचा इशारा

तलवाडा । प्रतिनिधी

साईराम मल्टिस्टेट व ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये अडकलेले पैसे ठेवीदारांना तात्काळ परत केले जावे यासाठी काल शुक्रवार दी. ५ जुलै ठेवीदार व खातेदार संघर्ष समितीनं हलगी बजाओ आंदोलन केलं. या प्रकरणात १९ तारखेपर्यंत कारवाई न झाल्यास थेट गोदावरीच्या पात्रात जलसामधी घेण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष व ठेवीदार,खातेदार संघर्ष समितीच्या प्रमुख पूजा मोरे यांनी प्रशासनाला दिला.

बीड जिल्ह्यात ज्ञानराधा मल्टीस्टेट,साईराम मल्टीस्टेट,राजस्थानी मल्टीस्टेट,जिजाऊ मल्टीस्टेट,लक्ष्मी माता अर्बन आणि मराठवाडा अर्बन या मल्टीस्टेटमध्ये हजारो ठेवीदारांनी आपल्या ठेवी ठेवल्या होत्या.परंतु गेल्या सहा महिन्यांपासून या सर्व मल्टीस्टेटला कुलूप लागले आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपयांच्या ठेवी यात अडकून पडल्या आहेत.

यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गेवराई पोलीस स्टेशनपर्यंत रॅली काढत, हालगी वाजवत हे आंदोलन केले गेले आहे. यावेळी साईराम मल्टिस्टेटचे साईनाथ परभने व संचालक मंडळ यांना तातडीने अटक करण्यात यावी, साईनाथ परभणे व सुरेश कुटे यांची, संचालक मंडळाची व नातेवाईकांची मालमत्ता तातडीने जप्त करण्यात यावी व ज्ञानराधा मल्टिस्टेट व साईराम मल्टिस्टेटवर गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येवू नये अश्या मागण्या यावेळी करण्यात आल्या.



### प्रशासनाला ठेवीदारांचे बळी घ्यायचे आहेत का?- पूजा मोरे

ठेवीदारांना ,खातेदारांना बिना माय बापाच्या लेकरांसारख या त्या कार्यालयात फिरण्याची वेळ आली आहे. कुणाचे शिक्षण,तर कुणाचे लग्न, दवाखाने पैसे नसल्याने बाकी आहेत मात्र यांना कोणी वालीच नसल्याचे दिसून येतंय. या सर्व मल्टीस्टेटच्या संचालकांना वाचवण्याचे काम प्रशासन करीत आहे. ठेवीदारांनी आत्महत्या केल्याशिवाय प्रशासनाला जाग येणार नाही का? संचालक मंडळावर गुन्हे दाखल होवुनही पोलीस त्यांना अटक का करीत नाही ?त्यांच्या मालमत्ता जप्त का करीत नाहीत ? उलट पोलीस त्यांना संरक्षण देत आहेत का ? असा आरोप पुजा मोरे यांनी केला.

यामध्ये बहुतांश खातेदार शेतकरी होते. यावेळी पोलीस प्रशासन साईराम मल्टिस्टेटच्या संचालक मंडळाच्या अटकेला उशीर करत असल्याने पोलीस स्टेशनसमोरच ठेवीदारांनीच नारळ फोडून अटकेचा शुभारंभ करा अशी मागणी केली. १९ जुलैपर्यंत मल्टीस्टेट प्रकरणातील आरोपींना अटक झाली नाही, त्यांची मालमत्ता जप्त झाली नाही तर थेट गोदावरीच्या पात्रात जलसमाधी आंदोलन करण्यात येईल,' असा इशारा या आंदोलकांच्या नेत्या पूजा मोरे यांनी दिला.



# पंकजा मुंडे यांचा डॉ.योगेश क्षीरसागरकडून सत्कार

बीड । प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांची विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबईत भेटून शुक्रवारी (दि.५) सत्कार केला. दरम्यान, पंकजा निवड जवळपास निश्चित मानली जात आहे.

पंकजा मुंडे व डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर यांचे जिव्हाळयाचे संबंध आहेत. विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन सत्कार केला. त्यांच्यासोबत बीड विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक विषयांवर चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे आणि महायुतीच्या नेत्या पंकजा मुंडे यांच्या माध्यमातून येत्या काळात जिल्ह्याचा विकास होईल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, आगामी राजकीय वाटचालीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांना पंकजाताईंनी 'आशीर्वाद' दिले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीची कार्यकारणी जाहीर



बीड । प्रतिनिधी

बलभीम नगर पेठ बीड येथे, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम ज्यामध्ये सर्व रोग निदान शिबिर, महिलांना साडी वाटप, रक्तदान, गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार , अन्नदान कार्यक्रम, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, अशा विविध उपक्रमाने साजरी करणार आहे असे जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी म्हटले आहे. त्याच अनुषंगाने आज बलभीम नगर येथे जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये जाहीर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव हे होते तर उपस्थितामध्ये सादिक भाई, रुस्तुम भाऊ बेद्रे,विजेंद्रसिंग डूलगच, चेअरमन विजय भाऊ जाधव, सीताताई भोसले,नरेश पीव्हाळ, अशोक उर्फ मायकल वाघमारे, आदी मान्यवर लाभले.

जयंतीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते शेख खदीर भाई यांची निवड झाली तर उपाध्यक्षपदी युवा नेते भैय्यासाहेब मस्के, सचिव पदी कचरू वाघमारे यांची निवड करण्यात आली. सहसचिव पदी रामभाऊ वाघमारे, कोषाध्यक्षपदी गणेश हातागळे, व्यवस्थापक पदी अभिजीत गायकवाड तर सदस्य पदी विशाल धुतावळे, करण लांडगे, विनोद कोकाटे, अनिल डोंगरे, सुनील माने, अविनाश हातागळे, रोहन घुले, अमित चांदणे, मंथन राऊत, रामेश्वर शिरसागर, सनी हजारे, आदित्य पवार, अभिषेक जाधव आदीयाप्रसंगी माजी अध्यक्ष अनिल चांदणे, राहुल चांदणे,भारत पिवळ,विशाल कांबळे, किरण शिंदे, केके कांबळे, सुरज धारू, पिंटू ओहाळ, सुरेश गायकवाड, अजय मुंडे, अमोल जाधव, अण्णा लोंढे, बाबु इनकर, बाबू जाधव, साहिल पिवळ, जयदत्त जाधव, किरण जोगदंड, राहुल पवळे, संतोष मस्के, संजय उबाळे, सुरेश पिवळ, आनंद शिंदे, लखन पिवळ, शिव पिवळ,अमोल धनवे, राहुल वावळे, शरद विटकर, बाबासाहेब उपळकर आधी उपस्थित होते.

आभार प्रदर्शन जयंती उत्सव समिती स्वागत अध्यक्ष स्वप्नील हातागळे यांनी मानले.

# मत्स्येंद्रनाथगड ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडीचे रायमोहात स्वागत



रायमोहा । प्रतिनिधी

ब्रम्हलिन संत स्वामी निगमानंद महाराज गुरू संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांची प्रारंभित केलेला श्री क्षेत्र संस्थान मत्स्येंद्रनाथगड ते श्री क्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा महंत स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंदजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गस्थ होत असताना ऐतिहासिक रायमोहा नगरीत दिंडी सोहळ्याचे आगमन होताच टाळ -मृदंगाच्या गजरात ग्रामस्थांनी स्वागत केले व महंत स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज यांचे आदरतिथ्य केले, त्याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष काका क्षीरसागर, किरणजी चव्हाण,सुभाष आप्पा मेहेत्रे,प्रकाश इंगळे,गोकुळ सानप,रायमोहाकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते व दिंडीत सोहळ्यात येणा-या सर्व वारक-यांना अनेक वर्षापासुन माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष काका क्षीरसागर व क्षीरसागर परिवार यांच्या वतीने स्नेहभोजन देण्यात येते.



पिंपळवंडी: पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पंचक्रोशीतील भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनची श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग ते पंढरपूर पायी दिंडी मठाधिपती गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दि.६ जुलै २०२४ रोजी सकाळी १२ वाजता मार्गस्थ झाली.यावेळी पिंपळवंडी येथे हजारोंच्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती.

# आष्टी आगारातील यांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या मदतीला धावले माजी मंत्री सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या आष्टी आगारामध्ये अवजड टायर खोलण्याचे मशीन आणि गंजलेले नटबोल्ट काढण्याचे मशीन नसल्यामुळे यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे होणारे कष्ट पाहून..पूर्व आमदार माजी मंत्री सुरेश धस यांनी ते दोन्ही यंत्रसामग्री व खर्चातून उपलब्ध करून दिली आहे यामुळे आष्टी आगारातील यांत्रिकी कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त करून.. सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.. याबाबतची अधिक माहिती अशी की,काही दिवसांपूर्वी.. पूर्व आमदार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी एका छोटेखानी कार्यक्रमानिमित्ताने भेट दिली.**



यावेळी यांत्रिक कर्मचाऱ्यांना जवळ घेऊन विचारपूस केली. यावेळी यांत्रिक कर्मचारी रघु चितळे यांनी अपुऱ्या यंत्रसामग्रीमुळे होणाऱ्या त्रासाची व्यथा मांडली असता...सुरेश धस यांनी लगेचच मदतीचा हात पुढे करत गाडीचे अवजड टायर खोलण्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून मशीन नादुरुस्त असल्याने तसेच गंजलेले झालेल्या नट बोल्ट काढण्यासाठीचे हे दोन मशीन तसेच इतर यंत्र सामग्री स्वखर्चाने विनाविलंब उपलब्ध करून यांत्रिक कर्मचारी यांच्याकडे स्वाधीन केल्या... ही अडचणीची मदत केल्याबद्दल राज्यमार्ग परिवहन महामंडळ आष्टी आगारातील यांत्रिकी आणि इतर कर्मचाऱ्यांनी अतिशय आनंदी भावना व्यक्त करत समाधान व्यक्त केले.यासाठी आज आगारातील सर्व कर्मचाऱ्यांनी सुरेश धस यांचे त्यांच्या निवासस्थानी जाऊन कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक शरद खोत,वाहतूक निरीक्षक राजरत्न जाधव, साहाय्यक वाहतूक अधिकारी बबन गायकवाड तसेच आगारातील यांत्रिक कर्मचारी रघुनाथ चितळे,अशोक परदेशी, के.जी.गव्हाणे,बाळासाहेब थोरवे, सचिन काळे, सोपान आघाव,राजेंद्र ठाकरे, कैलास धोत्रे,चौधार,अविनाश देशमुख ,राजेश थोरे, सिडाम,गणेश वारंगुळे,दत्ता गायकवाड, थोरवे,लिंगे हे उपस्थित होते.

# दिंडी मधील वारकऱ्याची मोफत आरोग्य तपासणी



धारूर । प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर या महामार्गावरून आषाढी वारीसाठी मोठ्या प्रमाणावर वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहेत धारूर येथे पालखीतील वारक-याचे आरोग्य तपासणी करून त्यांना गोळया औषध चे वितरण करण्यात आले.या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे

किल्ले धारूर येथे आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांची आरोग्याची तपासणी मोफत करण्यासाठी धारूर येथील नामवंत डॉक्टर यांनी एकत्र येत वारकऱ्यांचे मोफत आरोग्य तपासणी करून आवश्यक ती सर्व औषधी मोफत देण्यात आले यावेळी डॉ.मयूर सावंत व डॉ.नवनाथ चव्हाण यांनी सर्व वारक-याची आरोग्य तपासणी नगरेश्वर मंदिर येथे करण्यात आले. या वेळी युवक कार्यकर्ते अमर महामुनी यांनी वारक-याची जेवनाची व्यवस्था केली होती. या तपासणी शिबीरा साठी सहकार्य म्हणून कुलदीप जगताप,नितीन शेटे,बबलू रेपे ,कुणाल अवगुने, सचिन चोले, निहाल जरगर, व उपस्थित होते.

# स्वराज्यझेप प्रतिष्ठानचा उपक्रम कौतुकास्पद व प्रेरणादायी-भारती महाराज

## पिंपळवंडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पिंपळवंडी

शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे तो पिणारा गुरगुरणारच त्या प्रमाणे विद्यार्थ्यांनी जिद्द-चिकाटी बाळगून खूप अभ्यास करून उच्च पदावर जाण्याचा प्रयत्न करावा.तसेच गुणवंतांनी गुणवत्ता टिकविली पाहिजे.असा उपदेश करत स्वराज्यझेप प्रतिष्ठानचा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी काढले.

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.५ जुलै २०२४ शुक्रवार रोजी पाटोदा उपतालुकाप्रमुख (ऊबाठा) शिवसेना तथा संस्थापक अध्यक्ष स्वराज्यझेप प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक तात्या पवार व कार्य मंडळाच्या वतीने दहावी-बारावी परीक्षेत गुणवंत ठरलेल्या व नीट, विविध परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज तसेच प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक परमेश्वर सातपुते (उबाठा)शिवसेना जिल्हाप्रमुख बीड,प्रमोद कुदळे उपविभागीय अधिकारी पाटोदा,संदीप पवार सर (आदर्श शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार) भार्गव सपकाळ सह पोलीस निरीक्षक पोलीस



स्टेशन अंमळनेर हे होते.तर व्यासपीठावर सरपंचपती निलेश मोरे,उपसरपंच दादासाहेब पवार,जिल्हा संघटक रतन गुजर, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,शिवसेना शिरूर तालुकाप्रमुख सोपान मोरे,शिवसेना पाटोदा तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे,प्राचार्य दिलीप पवार,शिवसेना पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक पवार तसेच अजिंक्य डोरले,अजय गायकवाड, कृष्णा चौरे,ज्ञानेश्वर पवार,उद्धव शेठ पवार,अर्जुन शेठ पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार, तलाठी वारंगुळे, महेश भालेकर आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमातून महादेवानंद भारती महाराज, कुदळे ,परमेश्वर सातपुते, संदीप पवार, सपकाळ यांनी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना भाषणांमधून मोलाचे मार्गदर्शन केले. माणूस वाचनाने ज्ञानी व समृद्ध होतो. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष देऊन गुणवत्ता सिद्ध करावी. शिक्षण आणि नोकरी प्रमाणे रोजगार क्षेत्रात अनेक संधी आहेत. शिक्षणाने अनेक रोजगार मिळतात. शिक्षणामुळे कौशल्य व कला आत्मसात करावी.पूर्वी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सुविधा नव्हत्या आता भरपूर सुविधा आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार, अध्यात्मिक ज्ञान असले पाहिजे त्याशिवाय शिक्षणाला महत्त्व नाही.विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षण घेऊन यशस्वी झाले पाहिजे.बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षण घेण्यासाठी परिश्रम खूपच महत्त्वाचे असतात. विद्यार्थ्यांनी भावी आयुष्याची स्वप्ने पाहिली पाहिजेत. शिक्षणात चढ-उतार होतच असतात. यश अपयश ठरलेले असते.अपयश ही यशाची पायरी असते. अपयशाने खचून न जाता ध्येय साध्य करण्यासाठी जिद्द व चिकाटी समोर ठेवून यशाचे शिखर गाठता येते. वाचाल तर वाचाल हे लक्षात ठेवून पुस्तक व शिक्षकांवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी भविष्य घडवावे.तसेच सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,डॉ. अब्दुल कलाम यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा असे मनोगत यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अशोक पवार, गोकुळ पवार, शिवाजी पवार, श्रीकांत उकांडे, मनोज भराटे, विजय डांभे, सलीम सय्यद, जयसिंग जरे, चंद्रकांत पवार, कलीम सय्यद, राहुल खोटे आदीसह प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.आर. पवार सर व राजेश पवार सर यांनी केले.तर आभार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक पवार यांनी व्यक्त केले.

# धारूर पोलीस स्टेशन आवारात वृक्षारोपण



धारुर । प्रतिनिधी

धारूर पोलीस स्टेशन चे आवारात सहायक पोलीस निरीक्षक डि.बी. वाघमोडे व सर्व कर्मचा-यानी एकत्रित येऊन डोंगराळ भागावर वृक्षारोपण करून हि वृक्ष दत्तक घेऊन हे वृक्ष वाढवण्याचा व जोपासण्याचा संकल्प करण्यात आला.

धारूर पोलीस स्टेशन आवारात सर्व डोंगराळ भाग असुन वृक्ष लागवड करून हा भाग हिरवागारकरण्या साठी येथील सहायक पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे यांनी वरीष्ठाचे मार्गदर्शना खाली व सर्व कर्मचा-याना सोबत घेऊन वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला पोलीस निरक्षक सुरेखा धस यांनी त्यांचे कार्यकाळात पोलीस स्टेशन चे माघील आवारात घनदाट वृक्ष लागवड मोहीमेतून वृक्ष लागवड करून त्याची जोपासणा चांगली केली होती या घनदाट वृक्ष लागवड नेआता चांगले रुप घेतले आहे या कडे जाणारे रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवड करून या पोलीस स्टेशनला परीसर हिरवा गार करण्याचा संकल्प करत सहायक पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे यांनी सर्व कर्मचा-याना सोबत घेऊन वृक्षारोपन मोहीम राबवली हि वृक्ष चांगली जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. या वेळी अधिकारी व सर्व कर्मचारी सहभागी झाले होतो.

# ‘ज्ञानोबा तुकाराम’ जय घोष करीत हजारो भाविक पंढरीच्या दिशेने ; नारायणगडच्या दिंडीचे पंढरीकडे प्रस्थान

**शिरूर । शंकर भालेकर**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठुरायाच्या दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकभक्त श्री.क्षेत्र नारायणगडाच्या दिंडीमध्ये सहभागी होऊन टाळ मृदंगाच्या गजरामध्ये 'ज्ञानोबा तुकाराम'असा जय घोष करत पंढरीच्या दिशेने पाऊल निघाले आहेत. गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा शनिवार दि. ७ जुलै रोजी सायं ४ वाजता पंढरपुराच्या दिशेने मार्गस्थ झाला आहे . या सोहळ्यातील भाविक भक्त आपल्या डोक्यावरती कपडालत्याचे बोचके घेऊन टाळी वाजवत विठू रायाचे नामस्मरण करत मोठ्या थाटामध्ये पंढरीकडे जाण्यासाठी नारायणगडचा डोंगर उतरले आहेत.

धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायणगड येथून गेल्या अनेक वर्षापासून आषाढी एकादशी निमित्त पंढरीची वारी करण्यासाठी किंबहुना विठुरायाचे दर्शन करण्यासाठी पायी दिंडी सोहळा गडाच्या माध्यमातून जात असतो. गेल्या अनेक वर्षाची ही गडाची वैभवशाली परंपरा सांभाळत गडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली याही वर्षी पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्तांच्या सहभागातून पायी दिंडी सोहळा आज शनिवार दि.७ जुलै रोजी सायं ४ वाजता निघाला होता. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पंचक्रोशीतून हजारो भाविक भक्त या पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होऊन पंढरीची वारी करण्यासाठी निघाले आहे. दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास महंत शिवाजी महाराज व विश्वस्त मंडळ यांच्यावतीने श्री नगद नारायण महाराज यांच्या समाधीचे व येथील देवतांचे विधिवत





## बेलुरा येथे पहिला मुक्काम

श्री क्षेत्र नारायण गडाच्या दिंडी सोहळ्याचा पहिला मुक्काम गडाच्या पायथ्याशी असलेल्या बेलुरा या गावी होणार ग्रामस्थांच्या वतीने त्या ठिकाणी भव्य स्वरूपात दिंडीचे स्वागत करण्यात आले आहे. सोहळ्यातील भाविक भक्तांना या ठिकाणी गावकऱ्यांच्या वतीने भोजनाची पंगती देण्यात आली आहे. या ठिकाणी दिंडीच्या नियमाप्रमाणे हरिपाठ व रात्री कीर्तन असा नित्यक्रमाचा कार्यक्रम पार पडणार पडणार आहेत.गडाच्या पायथ्याशीच हे गाव असल्याने पंचक्रोशीतून त्या संख्येने भाविक भक्त कीर्तन श्रवण करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

पूजन करून महाराजांनी श्री.नगदनारायणाच्या पादुका ताटामध्ये घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली व त्या पादुका पालखीच्या रथामध्ये ठेवून पुंडलिक वरदा असा जयघोष करून दिंडीला मार्गस्थ होण्याचा आदेश दिला. या दिंडी सोहळ्याने मंदिराच्या गाभाऱ्याला प्रदक्षणा घालून दिंडी सोहळा ज्ञानोबा तुकाराम असा जयघोष करत मंदिराच्या गाभाऱ्यातून बाहेर पडला. पुढे डीजे चा दणका त्या पाठोपाठ बँड पथकाचे मनाला भक्तिमय करणारी धून, झेंडेकरी, हंडेकरी, तुळशी वाले एका पाठोपाठ टाळकरी मंडळ एका मागे एक रांगेत चालून वारकरी संप्रदायाचं भव्य प्रदर्शन या ठिकाणी दाखवत होते. या सोहळ्याला मार्गस्थ करण्यासाठी ( वाटेला लावण्यासाठी) पंचक्रोशीतून हजारो भाविक भक्तही सहभागी झाले होते यामुळे गडावरती एक मंगलमय सोहळा पाहायला मिळत होता. ज्ञानोबा तुकाराम महाराज निघालेला सोहळा नारायणगडचा डोंगर उतरतांना मनाला भक्तिमय भुरळ घालणारा क्षण अनुभवायला मिळाला.

## विश्वस्त मंडळाकडून दिंडी सोहळ्याला शुभेच्छा

बीड जिल्ह्यातून श्री क्षेत्र नारायणगडाचा वैभवशाली सोहळा पंढरीला जातो या सोहळ्याचा अध्यात्मिक क्षेत्रामध्ये मोठा नावलौकिक आहे. या सोहळ्याच्या आकर्षण पाहण्यासाठी जिल्हाभरात भाविक भक्त आजच्या दिवशी गडावरती दाखल होत असतात. सोहळ्याला मार्गस्थ करण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर ही उपस्थित राहत असतात. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या मध्ये माजी आमदार सुरेश नवले, विश्वस्त समितीचे सचिव महादेव तुपे, सदस्य दिलीप गोरे, जे पी शेळके, बळीराम गवते, बी. ए. जाधव, अनिल जगताप आदी विश्वस्त मंडळी सह केतुरा गावचे सरपंच परमेश्वर तळेकर, नवनाथ काशीद यावेळी उपस्थित होते. विश्वस्त मंडळीच्या वतीने महंत शिवाजी महाराज यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार घालून संत पूजन करण्यात आले व दिंडी सोहळ्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# कृषी कार्यालयाला टाळे ठोको व रस्तारोको आंदोलनावर भाई गंगाभिषण थावरे ठाम

**कृषी अधिकाऱ्यांनी आंदोलन मागे घेण्याची केली विनंती**

माजलगाव । प्रतिनिधी

पीएम किसान योजनेपासून माजलगाव सह जिल्हयातील शेतकरी वंचित राहात असून कृषी विभागाकडून कसलीही उपाययोजना केली जात नसल्याने शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी माजलगावच्या कृषी कार्यालयाला टाळे ठोको आंदोलन व रस्तारोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. दरम्यान शुक्रवारी कृषी आधिकाऱ्यांनी माजलगाव येथे भाई थावरे यांची भेट घेऊन आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.मात्र भाई थावरे यांनी आंदोलनावर ठाम असल्याने सांगत पीएम किसान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना द्यावा अशी मागणी केली आहे.



पाच वर्षांपूर्वी जिल्ह्यात पीएम किसान योजना लागू झाली.मात्र ७० ते ८० अर्ज पडून असून माजलगाव विधानसभा मतदारसंघात २५ ते ३० हजार लाभार्थी लाभापासून वंचित आहेत.यामुळे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे यांनी उद्या दि ०७ जुलै रोजी माजलगावच्या कृषी कार्यालयाला टाळे ठोकण्याचा तसेच दि १५ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. दरम्यान कृषी अधिकाऱ्यांनी दि ०५ जुलै रोजी थावरे यांची भेट घेतली. पीएम किसान योजनेबाबत प्रशासकीय कार्यवाही सुरु असून अपुऱ्या मनुष्यबळामुळे विलंब होत आहे. जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाकडे डाटा एन्ट्री ऑपरेटर व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आल्याचे कृषी आधीकाऱ्यांनी सांगितले.पीएम किसान योजनेचे पोर्टल बंद असल्याने अडचणी येत असून थावरे यांनी आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती केली. मात्र कृषी विभागाने मनुष्यबळ उपलब करुन यंत्रणेत सुधारणा करावी व शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ द्यावा अशी मागणी करत आंदोलनावर ठाम असल्याचे सांगितले.

# आ.लक्ष्मण आण्णांची वचनपुर्ती

## संजयनगर साठेनगर मधील ३२२ अतिक्रमण धारकांना घरकुल मंजुर

**गेवराई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या पंतप्रधान घरकुल आवास या महत्त्वकाक्षी योजनेंतर्गत आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या प्रयत्नातून शहरातील संजयनगर येथे १५० तर साठेनगर मधील १७० घरकुलाला मंजूरी मिळाली आहे त्याच्यी प्रोसेस प्रगतीपथावर सुरु आहे.



शहरातील संजयनगर, साठेनगर, संघमित्र नगर, इस्लामपूरा,भिमनगर, मध्ये गेली ३०ते४० वर्षांपासून गोरगरीब कुटुंब अतिक्रमण करून आपले वास्तव्य करून रहात आहेत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्व अतिक्रमण धारकांसह अनेक संघटनाने आंदोलन केले होते पण यश आले नाही

आ.लक्ष्मण आण्णा पवार गेवराईचे नगराध्यक्ष झाले आणी त्यांनी शहरातील अतिक्रमण धारकांना न्याय मिळवून देण्यासाठी २१ सप्टेंबर २०१२ रोजी मोर्चा काढला होता तेव्हापासून आ.लक्ष्मण पवारांकडुन शासन निर्णयानुसार अतिक्रमण धारकांना नियमाकुल करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करत ९ ऑगस्ट २०२१ रोजी गेवराई शहरातील संजयनगर व साठेनगर येथील अतिक्रमण धारकांना नियमाकुल करून हाक्काचा पि.टी.आर. वाटप करुन आज संजयनगर व संघमित्र नगर येथे ३२२ घरकुलाला मंजुरी मिळवून देऊन आ.लक्ष्मण आण्णा पवार यानी दिलेल वचन पूर्ण करून वचनपुर्ती केली आहे त्यामुळे अतिक्रमण धारकांकडून आ.लक्ष्मण पवार यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

# काँग्रेस कमिटीने घेतली दखल सुरेश यादव ठरले उत्कृष्ट प्रचारक

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सेल विभाग आयोजित लोकसभा निवडणूक काँग्रेस पक्षाला मिळालेल्या देदीप्यमान विजयाबद्दल सत्कार समारंभ ३जुलै २०२४ रोजी शिवाजी मंदिर दादर मुंबई येथे महाराष्ट्र प्रभारी श्री.रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष श्री.नानाभाऊ पटोले यांचा राज्यस्तरीय भव्य सत्कार सोहळा समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी अ.भा.कॉ.कमिटी राष्ट्रीय समन्वयक के.राजुजी एस.सी. विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश लिलोटिया, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आ.वजाहत मिर्झा,प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन प्रमोद मोरे, प्रतिभा शिंदे,जिल्हा



काँग्रेस कमिटी अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी मा. रमेश चेन्नीथला मा.नानाभाऊ पटोले मा.के.राजूजी यांनी मेळाव्याला मार्गदर्शन केले.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी निर्देशानुसार सेल विभाग प्रदेश प्रमुख यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता महाविकास आघाडी व काँग्रेस पक्षाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ राज्यातील विविध जिल्ह्यात मा.राहुलजी गांधी यांच्या भारत जोडो यात्रा

# आंबेडकर चौकात पाईपलाईन फुटून पिण्याच्या पाण्याचा खळखळाट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील बऱ्याच ठिकाणी जुनी,पाईप लाईन लिकेज च्या बातम्या विविध्य वर्तमान पत्रात आल्या आहे सोशेल मीडिया वर व्हिडीओ व्हायरल झाले डिजिटल मीडियाने तर वर व्हिडीओ ,व बातमी व्हायरल केल्या आहेत। एवढ करून देखील आज आंबेडकर चौकाच्या बाजूला सावतामाळी चौका कडे जाणाऱ्या रस्त्यावर मागील आठ दहा महिन्यापूर्वी नवीन पाईपलाईन टाकून दर्जाहीन काम करून सम्बधीत गुतेदार याने लाखोचे बिल



उचलले आहे त्याच केलेल्या कामाचं पाईपलाईन फुटून पितळ उघड पडलं हे नक्की

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भगवान बाबा चौकाच्या बाजूचे रस्त्याचे काम पोकलेन जेसीबीच्या साह्याने खोदकाम चालू आहे हेच खोदकाम करताना. पिण्याच्या पाण्याची मेन पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया गेले तब्बल पाचशे मीटर हे पाणी वाहत असल्याचे नागरिक बोलत होते.अगोदरच दहा ते बारा दिवसाला येणाऱ्या पिण्याचे पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण आहेत. इतके पाणी वाया जात असताना देखील कुठलाही नगरपालिकेचा पाणीपुरवठा करणारा कर्मचारी त्या ठिकाणी हजर नाही नागरिकांनी मेन पाईपलाईन फुटल्याची फोनवर माहिती देऊन पाणी पुरवठा बंद करण्यात आला बोगस काम करणाऱ्या गुत्तेदार संबंधित इंजिनियर संबंधित नगरपरिषद अधिकारी यांची चौकशी होणार का असा सवाल नागरिकातुन होत आहे.

# अवैधरित्या गौणखनिज काढणाऱ्याची तहसीलदार मंडलाधिकारी तलाठी यांना शिवीगाळ करुन धमकी

**घाटनांदूर । प्रतिनिधी**

येथील गायरानातील अवैधरित्या मुरूम काढत असल्याची माहिती मिळताच पाहणी करावयास गेलेल्या तलाठी मंडळाधिकारी यांना शिवीगाळ करून तलाठयास धक्काबुक्की करून धमकी दिल्याची घटना घाटनांदुर येथे घडली याबद्दल चौकशी करण्यासाठी अंबाजोगाई तहसील कार्यालयाचे तहसीलदार यांनी आरोपीस फोन लावला असताना त्यांनाही शिवीगाळ करूनधमकी दिल्याची फिर्याद तलाठी यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून (ता.६) शनिवारी गुन्हा दाखल झाला आहे.

घाटनांदुर सज्जाचे तलाठी शशिकांत लक्ष्मण कराड यांना (ता.५) शुक्रवारी गायरान जमिनीतील गट क्र.७२० मधील अवैधरित्या मुरूम उत्खनन होत असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी मंडळाधिकारी श्रीमती. एम एस घुगे यांना सांगितले. दोघे गायराणात पाहणी करण्यास गेले असताना एक जेसीबी ट्रॅक्टर व अवैधरित्या मुरुमाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. पाहणी करून परत येत असताना तेथे देविदास उर्फ बाळू शिवाजी कुसळे आला. आम्हाला पाहून देविदास कुसळे म्हणाला तुम्ही येथे कशाला आलात म्हणून शिवीगाळ करून धक्काबुक्की करून मला बाजूला ढकळून दिले. याबद्दल श्रीमती घुगे यांनी तहसीलदार विलास तरंगे यांना झालेल्या घटनेची माहिती दिली असता आरोपी कुसळे यास चौकशीसाठी फोन लावला असताना त्यांनाही शिवीगाळ करून तू पंधरा मिनिटात घाटनांदुरला ये तुला देखील बघून घेतो असे म्हणून धमकी दिल्याची फिर्याद तलाठी कराड यांनी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात (ता.६) शनिवारी सायंकाळी दिली असून शिवीगाळ करून धमकी देऊन शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धान्याची कणगी ग्रामीण भागातून कालबाह्य: लोखंडी कोठ्यांचा व प्लास्टिक ड्रमचा होतोय वापर

## पूर्वी घरातील कणग्या बघून ठरविले जात होते विवाह

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

पूर्वी ज्वारी,बाजरी साठविण्याच्या विविध पद्धती उपयोगात आणल्या जात होत्या.यामध्ये कणगी हा महत्त्वपूर्ण प्रकार होता.या कणग्यांमध्ये जवळपास आठशे ते हजार क्विंटलपर्यंत धान्य साठवून ठेवले जात असे.आता धान्य साठवणुकीसाठी लोखंडी कोठ्या व प्लास्टिक ड्रम आल्यामुळे कणग्या लुप्त व कालबाह्य झाल्या आहेत.

ग्रामीण भागात पूर्वी वर्षभर पुरेल एवढे धान्य आणि बियाणे सांभाळून ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या पद्धती वापरल्या जात असत.या भागात, ज्वारी,बाजरी,ऊस, कापूस,गव्हासह अनेक पिके घेतली जातात.पूर्वी ज्वारी, बाजरी,गहू पिकांची काढणी झाल्यानंतर घरी आणून कणग्यांमध्ये साठवले जात होते. मात्र,कालांतराने कणग्या लुप्त व कालबाह्य होत गेल्या.कणगी प्रामुख्याने बांबूच्या पातळ काड्यांनी विणली जायची. कणगी साधारण सहा ते सात फुटाची असायची.नवी कणगी वापरण्यापूर्वी ती आतून बाहेरून शेणाने सारवून घेतली जात असे.उन्हात चांगली वाळल्यावर त्यात धान्य भरले जायचे. धान्य भरून झाल्यावर कणगीच्या तोंडावर गवत पसरवून ते शेणाने लिपले जायचे.कणग्यात धान्य अनेक वर्षे टिकत असल्याने याचा वापर केला जात होता.शिवाय, धान्याला कीड लागत नसायची, तसेच कोणत्याही रासायनिक प्रक्रियेशिवाय वर्षभरासाठी धान्य साठवले जात होते. त्याकाळी घरातील कणगी बघून विवाह ठरविला जात,असे पूर्वीचे लोक म्हणतात.आता हीच कणगी हद्दपार झाली आहे.मातीचे अंगण असणाऱ्या घरांनी आता सिमेंट काँक्रिटची जागा घेतली आहे.तसे धान्य साठवण्याच्या कणगीची जागा आता लोखंडी कोठयांनी घेतली आहे.बाजारात ३० किलोपासून ते २०० किलोपर्यंत धान्य साठवणाऱ्या लोखंडी कोठ्या उपलब्ध आहेत. ग्रामीण भागातील आता चित्र बदलत आहे.शहरीकरणाचे वारे ग्रामीण भागात शिरल्यामुळे चुलीपासून ते घरापर्यंत सर्वकाही बदलत चालले आहे.ग्रामीण भागात गॅस आला आहे.विजेवर चालणाऱ्या शेगड्या अवतरल्या आहेत. कुडाच्या





घरांच्या जागी सिमेंटची घरे आली आहेत.घरात टीव्ही,फ्रिज,पंखे आली आहेत. मोबाईल आला आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील चित्रच बदलून गेले आहे.त्यामुळे अनेक वस्तूदेखील ग्रामीण भागातून हद्दपार व कालबाह्य होऊ लागल्या आहेत.



## गावरान मेवा हद्दपार

ग्रामीण भागात फार्महाऊस उभारले जात आहेत.श्रीमंत शेतकरी मळ्यात म्हणजेच शेतात फार्महाऊस उभारत आहेत.तिथे हॉटेलसारख्या सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत. त्यामुळे आता ग्रामीण भागातील गावरान मेवाही हरवून गेला आहे.

## धान्यासाठी लोखंडी कोठ्यांचा व प्लास्टिक ड्रमचा वापर

कणगीचा आकार हा ‘रांजणा’ सारखा किंवा तळापासून गोल व्यास उंचीपर्यंत वाढता आणि त्या नंतर निमुळता होत जातो.कणगीमध्ये धान्य कित्येक वर्ष कुठल्याही प्रकारची प्रक्रिया न करता चांगल्या स्थितीत राहते.मात्र आता कानगीची जागा प्लास्टिक ड्रम आणि पत्र्याच्या कोठ्यांनी घेतल्यामुळे धान्याला लवकर कीड लागते. धान्याला कीड लागू नये म्हणून त्या मध्ये विशिष्ट प्रकारची पावडर टाकली जाते.ते आरोग्यासाठी हानिकारकही असू शकते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# गृहमंत्री झोपले आहेत का? पालकमंत्री कुठं आहेत? रोहित पवारांचा हल्लाबोल

**बारामती । प्रतिनिधी**

गुंडांना भीती वाटेनाशी झाली आहे. गृहमंत्री झोपले आहेत का? पालकमंत्री कुठे आहेत? अशी विचारणा शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली. पुण्यामध्ये पोलिस अधिकाऱ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर रोहित पवार यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार शब्दात हल्लाबोल केला. खासदार सुप्रिया सुळे यांनीही पुण्यातील घटनांवरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार प्रहार केला.

संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात आमदार रोहित पवार सहभागी झाले. बारामती तालुक्यातील बऱ्हाणपूर येथे त्यांनी तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पालखीच्या रथाचे सारथ्य केलं. तसेच फुगडी खेळण्याचा तसेच टाळ देखील वाजवण्याचा आनंद लुटला. यावेळी रोहित पवार यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. ते म्हणाले की, पोलिसांवर हल्ले होऊ लागली आहेत. जमिनीवरून लोकांसाठी काम करायचं असतं. सरकार ते काम करत नाही, अशी टीका त्यांनी केले.



देवेंद्र फडणवीस दोन समाजात द्वेष निर्माण करतात

रवींद्र वायकर यांना मुंबई पोलिसांकडून क्लिन चिट देण्यात आल्यानंतर रोहित पवार यांनी खोचक शब्दांमध्ये टीका केली. वायकर भाजप सोबत आल्याने त्यांना लॉलीपॉप किंवा गिफ्ट दिलं आहे. सत्तेत असलेली लोक गुंडाचा वापर करतात होते त्यामुळे त्यांना भीती वाटत नाही. देवेंद्र फडणवीस दोन समाजात द्वेष निर्माण करतात. आम्ही या सरकारचा भ्रष्टाचार बाहेर काढला आहे. अजून पुढील काळामध्ये बाहेर काढत राहू, असा इशारा त्यांनी दिला. सर्वसामान्य लोकांचे सरकार महाराष्ट्रामध्ये आणणार असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी सुद्धा राज्याच्या मध्ये बसलेल्या परिस्थितीवरून प्रयत्न जोरदार टीका केली. सुप्रिया सुळे म्हणाल्या की राज्यामध्ये परिस्थिती गंभीर आहे. क्राईम वाढत असल्याचे डेटामधून स्पष्ट होत आहे. आधी नागपूर क्राइम कॅपिटल होती आता पुणे होत असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी केली. वायकर यांना दिलेल्या क्लीन चिटवरून सुद्धा सुप्रिया सुळे यांनी खोचक शब्दांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली. हे लोक भ्रष्टाचारी नाहीत, तर आधी आरोप करायचे मग पक्षात घ्यायचं. देवेंद्र फडणवीस यांनी आरोप करायला सुरुवात केली. आरोप केले खरे काय खोटे काय याची श्वेतपत्रिका काढली पाहिजे, भ्रष्टाचाराची चेष्टा भाजपने केली आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

# सुप्रिया सुळेंनी वाल्हेत घेतले माउलींचे दर्शन

**वेल्हे । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवारी (ता. ५) रात्री उशिरा पालखी तळावर जाऊन माउलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी सुळे यांनी पावसासाठी माउलींना साकडे घातले. याप्रसंगी त्यांनी वारकऱ्यांशी मनमोकळेपणे संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी वारकऱ्यांची त्यांच्यासोबत छायाचित्र काढण्यासाठी झुंबड उडाली होती.



टाळ-मृदंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम, डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती पताका घेतलेले वारकरी अशा भक्तिमय वातावरणात शुक्रवारी दुपारी आद्यरामायणकार महर्षी वाल्मिकींच्या तपोभूमी वाल्हेनगरीत श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा विसावला. पुणे जिल्ह्यातील शेवटच्या मुक्कामी पुरंदर तालुक्यातील वाल्हे येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा विसावला. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी रात्री उशिरा पालखीतळावर जाऊन संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांवर माथा टेकवून दर्शन घेतले. यावेळी माजी सभापती दत्ता चव्हाण, हनुमंत पवार, ग्रामपंचायत सदस्य सागर भुजबळ, संभाजी पवार, धनंजय भुजबळ, मनोज भुजबळ, प्रीतम डहाळे, साईनाथ चव्हाण, अजय कुदळे, रवींद्र लंबाते, गंधर्व शहा, सुधीर पवार, निखिल पवार उपस्थित होते. सुळे यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थिती दूर होऊन सर्व परिसर जलमय होऊन शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येवोत आणि त्यांच्या शेतमालाला बाजार मिळावा, दुधाला बाजारभाव मिळावा अशी प्रार्थना माउलींच्या चरणी केली. यावेळी देवस्थानच्या वतीने सुळे यांचा सन्मान करण्यात आला.

# दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीतर्फे जिल्हास्तरीय 'अमृतप्रभा समूहगान' स्पर्धेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

दि रास्ता पेठ एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय 'अमृतप्रभा समूहगान' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. गीत सादरीकरणासाठी 'प्रार्थना' हा यंदाच्या वर्षीचा विषय आहे, अशी माहिती स्पर्धा समन्वयक प्रसाद भडसावळे व संतोष अत्रे यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.



पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त डॉ. प्रभाताई अत्रे यांच्या नव्वदीपूर्तीनिमित्त डॉ. प्रभाताई अत्रे यांच्या इच्छेनुसार गतवर्षीपासून 'अमृतप्रभा समूहगीत गायन स्पर्धा' सुरू करण्यात आली आहे. गेल्या वर्षी स्पर्धेस शाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामुळे स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्याचा निर्णय संयोजकांनी घेतला आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश मूल्य नाही.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच देशाभिमान आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजावी म्हणून या वर्षी विद्यार्थ्यांना 'प्रार्थना' या विषयावर गीत सादर करायचे आहे. स्पर्धा शुक्रवार, दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात येणार असून पारितोषिक वितरण सभारंभ शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी आणि कनिष्ठ महाविद्यालय अशा तीन गटात स्पर्धा घेण्यात येणार आहे. प्रत्येक गटात तीन बक्षिसे आणि उत्तेजनार्थ बक्षिस दिले जाणार आहे. गीत सादर करण्याचा कालावधी कमित कमी तीन ते जास्तीत जास्त पाच मिनिटे आहे. स्पर्धक संख्या कमित कमी आठ ते जास्तीत जास्त १२ इतकी असावी. संवादिनी, तबला अथवा ढोलक, ढोलकी किंवा इतर वाद्यांची संख्या चारपेक्षा जास्त नसावी. इलेक्ट्रॉनिक वाद्यांना परवानगी नाही तसेच ट्रॅकवर गाणे सादर करता येणार नाही. एका संस्थेला तीनही गटात सादरीकरण करता येणार आहे.

# महिला आरोपीचे पुणे पोलिसांच्या तावडीतून पलायन, पोलीस शिपाई निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात दागिने चोरणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक होती. मात्र पुणे पोलिसांच्या तावडीतून महिला आरोपीने (ऋशारश्रश रलर्लीशव) पलायन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यातील महिला पोलीस शिपाई ताराबाई गणपत खांडेकर यांना निलंबित करण्यात आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, हडपसर भागात संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांची पालखी आल्यानंतर भाविकांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी झाली होती. त्यावेळी आरोपी धुरपता भोसले हिला दागिने चोरताना रंगेहाथ पकडून हडपसर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तिच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस शिपाई ताराबाई खांडेकर यांच्याकडे देण्यात आली होती.

आरोपीस खोलीत बसवून खांडेकर दुसरे काम करत होत्या. त्यावेळी त्यांची नजर चुकवून आरोपीने पोलीस ठाण्यातून पळ काढला. ती पसार झाल्याचे लक्षात आल्यावर तिचा सर्वत्र शोध घेण्यात आला. सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले गेले. परंतु ती मिळून आली नाही. त्यामुळे अटक आरोपीला योग्य ती खबरदारी घेत ताब्यात न ठेवल्याने बेजबाबदारपणा आणि बेपर्वाईचे वर्तन केल्याचा ठपका ठेवण्यात आला. पोलीस दलाची प्रतिमा या प्रकाराने मलीन झाली असून त्यामुळे महिला पोलीस शिपाई ताराबाई गणपत खांडेकर यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# लाडकी बहिण योजनेच्या अंमलबजावणीसाठी युवतीसेना प्रयत्नशील

**पिंपरी । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे योजना यशस्वी होण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच महायुतीचे घटक पक्ष असलेल्या तिन्ही पक्षांकडूनही प्रयत्न करण्यात येत आहेत विशेष करून शिवसेनेच्या नेत्या कार्यकर्त्यांनी योजना यशस्वी करण्यासाठी कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे आपापल्या प्रभागातील महिलांना या योजनेचा लाभ मिळावा म्हणून सर्व कार्यकर्ते नियोजन करत आहेत त्याचप्रमाणे अनेकांनी आपल्या पक्ष कार्यालयात अर्ज दाखल करण्याची सुविधा निर्माण करत आहेत तसेच त्याच ठिकाणी योजनेच्या लाभासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता महिलांना तेथेच करता यावी अशी सोय करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी युवती सेना उपजिल्हाप्रमुख सायली ताई साळवी महिलांसाठी अर्ज दाखल करण्याची सुविधा निर्माण करून देणार आहेत.



लोकतंत्र सोबत संवाद साधताना युवती सेना उपजिल्हाप्रमुख सायली ताई साळवी म्हणाल्या की मुख्यमंत्री शिंदे यांनी महिला सशक्तिकरण करण्यासाठी माझी लाडकी बहीण योजनेचा निर्धार केला. याचा महिलांना लाभ होणार आहे. जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा फायदा मिळावा यासाठी आम्ही युवती सेनेच्या वतीने अर्ज दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करून देणार आहे. महाराष्ट्र राज्याला लाभलेले अतिशय संवेदनशील मुख्यमंत्री यांचे लोकप्रतिनिधी म्हणून मनस्वी आभार.

यावेळी महिलांनी मोठ्या प्रमाणावर पुढे येऊन या योजनेचा लाभ घेण्याचे आव्हान देखील त्यांनी यावेळी केले.

# विद्या प्रबोधिनी प्राथमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**कोपरगांव । प्रतिनिधी**

विद्यार्थी अनेक उपक्रमांच्या, कलेच्या तसेच स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वतःचे व विद्यालयाचे नाव विविध स्तरावर उंचवण्याचे काम करतात. त्याचाच एक भाग महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी या परीक्षेत कोपरगाव शहरातील पुरोगामी शैक्षणिक संशोधन आणि शिक्षण सेवा ट्रस्ट संचलित, विद्या प्रबोधिनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून विद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकली आहे.सहा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहे. चि.स्वानंद संतोष शेंदुर्णीकर,चि.अर्णव दिगंबर वहाडणे, चि.प्रतीक चेतन गवळी, चि.ध्रुव प्रशांत जाधव,कु.तनुजा अर्जुन दारकुंड, चि.शैलेश सुरेश जानराव या सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे



वरील सर्व गुणवंत,यशवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक.महेश दाळिंबकर सर ,भाऊसाहेब कांबळे सर,वदक सर,शेटे सर,श्रीमती.खरे मॅडम,श्रीमती.भालेराव मॅडम,श्रीमती. ढेपले मॅडम,श्रीमती.औताडे मॅडम श्रीमती.गायकवाड मॅडम यांचे संस्था अध्यक्ष.हेमंत पटवर्धन, सचिव.दिनेश दारुणकर सदस्य सौ दिपाली पटवर्धन व सौ ज्योतीताई कोऱ्हाळकर आदित्य पटवर्धन शाळेचे मुख्याध्यापक.गवळी सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांचे अभिनंदन केले.

# महिला व बालविकास विभागामार्फत यशदा येथे ७ जुलै रोजी प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती, कायदे व यशोगाथाची माहिती राज्यातील सर्व जिल्ह्यातील महिलांना व्हावी याकरिता ७ जुलै रोजी यशदा येथे प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे येथे होणाऱ्या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते होणार असून पुणे व सातारा जिल्ह्यातील बचत गटातील महिला या सत्रात आपले अनुभव कथन करणार आहेत. तसेच शासनाच्या महिला बालविकास व उद्योग विभागाच्या महिला विषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे, असेही महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी कळविले आहे.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडविण्यासाठी शिवनगर संस्था ठरतेय यशस्वी ; शरद पवारांचे प्रतिपादन

**माळेगाव । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धीमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञाच्या युगात विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य व योग्य करिअरसाठी पुरिपुर्ण मार्गदर्शन व्हावे, नव्या संधीची माहिती विद्यार्थांना मिळावी या उद्देशानेच शिवनगर विद्या प्रसारक मंडळ ही संस्था काम करत आहे. त्यानुसार संस्था प्रशासनासह प्राध्यापकांनी यापुढे अद्ययावर ज्ञान घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सध्याचे बदलते शैक्षणिक धोरण स्वीकारावे, असे आवाहन ज्येष्ठ नेते व शिवनगर संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. यावेळी शिवनगरच्या विश्वस्त व खासदार सुप्रिया सुळे यांनीही संस्थेला परिपुर्ण करण्यासाठी मीही वर्षात १२ दिवस (प्रतिमहिना १ दिवस ) या संस्थेत कार्य़रत राहू इच्छिते असे सांगितले. सुळेंच्या या भूमिकेचे उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. माळेगाव (ता.बारामती) येथे शिवनगर विद्या प्रसारक



मंडळाचा वार्षिक कामकाजाचा आढवा देणे, संस्थेच्या विश्वस्त सुप्रिया सुळे यांची खासदारपदी निवड झाल्याच्या प्रित्यर्थ सत्कार समारंभात आज संस्थेचे अध्यक्ष शरद पवार बोलत होते. यावेळी शिवनगरचे उपाध्यक्ष ॲड. केशवराव जगताप, सचिव डॉ. धनंजय ठोंबरे, माजी उपाध्यक्ष रंजन तावरे, अनिल तावरे, रामदास आटोळे, अनिल जगताप, वसंतराव तावरे, गणपत देवकाते, रविंद्र थोरात, महेंद्र तावरे, सिमा जाधव, चैत्राली गावडे आदी प्राध्यापक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते

# पुण्यात महिला पोलीस अधिकाऱ्यासह दोघांना पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात एका मद्यपी वाहन चालकाने पोलिसांनी पकडले म्हणून महिला पोलीस अधिकाऱ्यासह दोघांना पेट्रोल सदृश ज्वलनशील पदार्थ अंगावर टाकून पेटवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी वेळीच प्रसंगावधान दाखविल्यामुळे मोठा अनर्थ टळला. महिला सहायक पोलीस निरीक्षक शैलजा जानकर आणि पोलीस हवालदार समीर सावंत हे दोघे जखमी झाले आहेत.




याप्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी संजय फकीरबा साळवे (वय ३२, रा. पिंपरी चिंचवड मुळ जालना ) याच्या विरूद्ध खुनाचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. हा प्रकार शुक्रवारी (दि. ५) सायंकाळी सात वाजता बुधवार पेठ परिसरात घडला आहे. याबाबत पोलीस हवालदार समीर सावंत यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संजय साळवे हा मद्य प्राशन करून वाहन चालवत असताना वाहतूक पोलिसांना मिळून आला. पोलीस त्याच्यावर कायदेशीर कारवाई करत होते. यावेळी त्याने पोलिसांच्या हातातील मशीन हिसकावून घेतले. हा प्रकार समजल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक शैलेजा जानकर तेथे आल्या. वाहतूक पोलिसांनी साळवे याला थांबवून ठेवले होते. काही समजण्याच्या आतच साळवे याने पेट्रोल सदृश्य ज्वलनशील पदार्थ जानकर आणि सावंत यांच्या अंगावर टाकला. त्यानंतर त्याने लाईटरने दोघांना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी वेळीच प्रसंगावधान दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला. हा प्रकार घडल्यानंतर साळवे याच्या विरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# दुधाला प्रति लिटर ४० रुपये हमीभाव द्या, अन्यथा गाई-म्हशींसह मंत्रालयासमोर आंदोलन करणार'-शिवसेनेचा इशारा

**आंबेगाव । प्रतिनिधी**

दुधाची पावडर आयात केली जाते. पाच रुपये बाजार भाव वाढून दिला जातो, पण बारा टक्के जीएसटी लावली जाते. दुधाचे बाजारभाव परवडत नसल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांच्या दुधाला प्रति लिटर ४० रुपये हमीभाव द्या, अन्यथा गाई-म्हशी घेऊन मुंबई येथे मंत्रालयासमोर आंदोलन करावे लागेल, असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पुणे जिल्हाप्रमुख सुरेश भोर यांनी दिला.

मंचर (ता. आंबेगाव) येथे शनिवारी (ता. ६) छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दूध दर वाढीसाठी आंदोलन करण्यात आले. त्यावेळी भोर बोलत होते. यावेळी जिल्हासंघटक राजाराम बाणखेले, उपजिल्हाप्रमुख दिलीप पवळे, जुन्नर तालुका प्रमुख माऊली खंडागळे, शिरूर तालुका प्रमुख गणेश जामदार, माजी सदस्य प्रज्ञा भोर, विकास जाधव, बबनराव गव्हाणे, दत्तात्रय खानदेशे, अरुण बाणखेले, भरत मोरे, हेमंत एरंडे, नितीन भालेराव, रोहन कानडे, गणपत घोडेकर, मयुरी भोर यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.



मंचर बसस्थानकापासून गोमातेची पूजा केल्यानंतर मोर्चाला सुरुवात झाली. लक्ष्मी रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलकांनी घेतलेल्या सभेत भोर यांनी राज्य व केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले, राज्यातील जवळपास सर्व शेतकरी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय करतात. पण, गेल्या सात-आठ वर्षात पशुखाद्याचे दर मात्र तीन पटीने वाढले. दुधाचे दर मात्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. दूध व्यवसाय परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना संकरित गाई विकण्याच्या प्रसंगाला सामोरे जावे लागत आहे. शेतकऱ्यांचा दूध व्यवसाय आर्थिक अडचणीत सापडला आहे. दुधाला तातडीने ४० रुपये हमीचा बाजारभाव द्या, अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन करावे लागेल. याची नोंद राज्य सरकारने घ्यावी.

राजाराम बाणखेले म्हणाले, केंद्रातील भाजप सरकार व राज्यातील शिंदे, फडणवीस सरकार शेतकऱ्यांचे भर दिवसा खिसे कापण्याचे काम करत आहे. दहा वर्षांपूर्वी दुधाला ३० ते ३२ रुपये बाजारभाव होता. तोच बाजार भाव कमी होऊन आता शेतकऱ्याला २३ ते २५ रुपये बाजार भाव मिळत आहे. शेतकऱ्यांनी कसा दूध व्यवसाय करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला. दूध उत्पादकांच्या भावनांचा अंत न पाहता दूध बाजार भाव वाढीचा निर्णय त्वरित जाहीर करावा.

दूध दरवाढीसाठी आंदोलन व भाषणे झाल्यानंतर निवेदन स्वीकारण्यासाठी प्रशासनातील अधिकाऱ्यांना थोडा उशीर झाला होता. त्यामुळे मुख्य चौकात शिवसैनिकांनी ठिय्या आंदोलन करून राज्यसरकार विरोधात घोषणाबाजी केली. आंबेगाव तालुक्याचे नायब तहसीलदार सचिन वाघ व पोलीस उपनिरीक्षक सोमशेखर शेटे यांनी आंदोलक शिवसैनिकांसमवेत सकारात्मक चर्चा केली. आंदोलन मागे घेण्याची विनंती केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. दरम्यान, आंदोलन प्रसंगी शिवसैनिकांनी रस्त्यावर दूध ओतले नाही. मसाला दूध करून उपस्थित नागरिक, दुकानदार व आंदोलकांना पिण्यासाठी दिले. शिवसैनिकांच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.